cmyk

## संपादकीय

### पराभवात संयम, विजयात विनम्रता!

राजकारणात विजय आणि पराभव हे कायमस्वरूपी नसतात. जनतेच्या कौलावर उभ्या असलेल्या लोकशाहीत कधी सत्ता मिळते, तर कधी विरोधी बाकांवर बसण्याची वेळ येते. त्यामुळेच पराभव उदारपणे आणि विजय विनम्रपणे स्वीकारण्याची परंपरा लोकशाहीत महत्त्वाची मानली जाते. कारण जनतेला केवळ आक्रमक राजकारण नको असते; तिला परिपक्वता, सभ्यता आणि जबाबदारीची जाणीव असलेले नेतृत्व अपेक्षित असते.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६६ | मंगळवार दि.२६ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### भारत–अमेरिका द्विपक्षीय करारावर लवकरच स्वाक्षरी

नवी दिल्ली: भारत आणि अमेरिकेने द्विपक्षीय सामरिक भागीदारीतील सातत्य कायम ठेवण्यावर भर दिला आहे. नवी दिल्लीत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्यात शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा पार पडली. व्यापार चर्चा आणि अमेरिकेच्या कडक व्हिसा धोरणांबाबतच्या चिंता व्यक्त होत असताना झालेल्या या चर्चेला महत्त्व दिले जात आहे. चर्चेनंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत दोन्ही नेत्यांनी विविध जागतिक आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर भाष्य केले. जयशंकर यांनी स्पष्ट केले की, दोन्ही देशांमधील संबंधांच्या केंद्रस्थानी नागरिक आणि त्यांचे परस्पर संबंध आहेत. अवैध स्थलांतराला आळा घालताना कायदेशीर प्रवाशांना, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना व्हिसा मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर व्हायला हव्यात अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### युद्ध थांबल्यास पाच दिवसात पुरवठा पुर्ववत

दिल्ली: पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक पुरवठा साखळी आणि ऊर्जा सुरक्षेबाबत चिंता वाढत असताना, केंद्र सरकारने सोमवारी एका संसदीय समितीला आश्वासन दिले की, भारत कोणत्याही व्यत्ययाला तोंड देण्यासाठी पूर्णपणे तयार आहे आणि संघर्षाची परिस्थिती निवळल्यास ''चार ते पाच दिवसांत'' पुरवठा पूर्ववत होईल. हे आश्वासन परिवहन, पर्यटन आणि संस्कृती विषयक संसदीय स्थायी समितीच्या सुमारे दोन तास चाललेल्या बैठकीदरम्यान देण्यात आले. या बैठकीत पश्चिम आशिया संकटातून निर्माण झालेल्या बदलत्या परिस्थितीवर बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. परराष्ट्र मंत्रालय, वाणिज्य मंत्रालय आणि पेट्रोलियम मंत्रालयाचे प्रतिनिधीही या बैठकीला उपस्थित होत.

### तामिळनाडूतील त्या जलद न्यायाची देशभरात चर्चा

चेन्नई: महिला आणि बालकांच्या सुरक्षेबाबत राज्य प्रशासनाची असलेली कटिबद्धता अधोरेखित करणारा एक ऐतिहासिक निकाल थुथुकुडी जिल्हा पॉक्सो न्यायालयाने दिला आहे. विलाथिकुलम येथील १२ वीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीवर झालेल्या अमानुष लैंगिक अत्याचार आणि खून प्रकरणात न्यायालयाने आरोपी धर्मा मुनीस्वरन याला दुहेरी फाशीची जन्मठेप सुनावली आहे. अवघ्या तीन महिन्यांच्या आत या खटल्याचा निकाल लावत न्यायालयाने पीडितेच्या कुटुंबाला अत्यंत वेगाने न्याय मिळवून दिला आहे. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण तमिळनाडू राज्य हादरले होते. अल्पवयीन मुलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या सरकारच्या संकल्पाला या निकालामुळे मोठे बळ मिळाले आहे. या संवेदनशील प्रकरणात तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेने दाखवलेली तत्परता कौतुकास्पद ठरली आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८४.५० क्विंटल | २,२३० | २,३८६ | २,३३३ |
| ज्वारी/हायब्रिड: १५५.०० क्विंटल | २,०९५ | ३,६९१ | २,६३४ |
| मका/लोकल: ८.५० क्विंटल | १,९४० | १,९४० | १,९४० |
| तूर : -- क्विंटल | -- | -- | -- |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: ६९.०० क्विंटल | १,८०० | २,६८१ | २,२२२ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:-- क्विंटल | -- | -- | -- |
| हरभरा: ५६.५० क्विंटल | ५,६०० | ५,८०२ | ५,७३४ |

# खरीप तोंडावर खत टंचाईची भीती

## मात्र देशात पुरेसा साठा असल्याचा केंद्राचा दावा

दिल्ली । वृत्तसंस्था

**खरीप हंगामाच्या तोंडावर अनेक भागांत खत टंचाईच्या तक्रारी वाढत असताना केंद्र सरकारने देशात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा केला आहे. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे पुरवठा साखळीवर परिणाम झाला असला तरी शेतकऱ्यांना खतांची कमतरता भासू देणार नाही, अशी माहिती खत विभागाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा एस. शर्मा यांनी दिली.**



पश्चिम आशियातील घडामोडींवर आयोजित आंतरमंत्रालयीन पत्रकार परिषदेत बोलताना शर्मा म्हणाल्या की, यंदाच्या खरीप हंगामासाठी देशाची एकूण खत गरज ३९०.५४ लाख टन इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी सध्या २००.१२ लाख टन खतसाठा उपलब्ध असून हा साठा अपेक्षित मागणीच्या ५० टक्क्यांहून अधिक आहे. सामान्यतः हंगामाच्या सुरुवातीला हा साठा सुमारे ३३ टक्के असतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, देशांतर्गत उत्पादनासोबतच खतांची आयातही सुरू असून पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आतापर्यंत देशात सुमारे ९५ लाख टन खतांचे उत्पादन झाले असून २२.६० लाख टन खतांची आयात भारतात दाखल झाली आहे. त्यामुळे एकूण ११७.६ लाख टन खतसाठ्याची भर पडली आहे. केंद्राने आधीच १३.५ लाख

▶▶ पान २ वर

# विधान परिषद निवडणूक:महायुतीतील जागा वाटपाचा तिढा मिटेना

## आम्ही तीघे एकत्र बसून चर्चेतून मार्ग काढू–फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**विधानपरिषदेच्या १७ पैकी १२ जागांवर हक्क सांगताना भाजपने ठाणे व पुण्याची जागा मागितल्याने महायुतीला तणाव वाढला असून, कोणतीही तडजोड करण्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाम नकार दिला आहे. शिंदेसेनेसोबतच अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही आग्रही भूमिका घेतल्यामुळे महायुतीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप कायम आहे. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, रायगड आणि पुणे या चार मतदारसंघावरून महायुतीत रस्सीखेच सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी स्वत: या दोन्ही मित्र पक्षांशी चर्चा सुरु असल्याची माहिती दिली. आम्ही तीघे एकत्र बसून चर्चेतून मार्ग काढू, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून देण्यासाठी होणाऱ्या निवडणूकीसाठी अर्ज भरण्यास सोमवारपासून (२५ मे) सुरुवात झाली. मात्र, महायुतीमध्ये अद्याप जागावाटपावर तोडगा निघालेला नाही. महायुतीमध्ये सुरुवातीला ठरलेल्या फॉर्म्युल्यानुसार भाजप १२, शिवसेना ३ आणि राष्ट्रवादी २ जागा लढणार असल्याची चर्चा होती. पण शिंदे सेनेने ७ जागांची मागणी केली तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे मतदारसंघावरून आग्रही भूमिका घेतली आहे. यामध्ये काही जागांची अदलाबदल केली

▶▶ पान २ वर



## शिल्पा शेट्टीच्या उपस्थित मुंबईसाठी वृक्षारोपण मोहिमा

मुंबई । प्रतिनिधी

डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल, वरळी आणि भामला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'वृक्षारोपण मोहिमेचे' आयोजन करण्यात आले. या उपक्रमात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होत विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण केले. या मोहिमेप्रसंगी जलसंपदा मंत्री जयकुमार रावल, मुंबईच्या महापौर रितू तावडे, प्रसिद्ध सिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी, भामला फाउंडेशनचे अध्यक्ष असिफ भामला,

▶▶ पान २ वर

## मंठा–परतुर परिसरात वादळीवारे

# वीज पडून एकाचा मृत्यू



जालना । प्रतिनिधी

परतूर मंठा परिसरातील अचानक चक्रीवादळ आल्यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड मोठ्या प्रमाणात झाली असून तसेच एक व्यक्तीची अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे आरडा तोलाजी ता. मंठा, जि. जालना येथील भारत साहेबराव गोरे यांचा वादळी पावसादरम्यान विज पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुःखद आहे. या दुःखद घटनेची तात्काळ दखल घेत यांनी मंठा तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून संबंधित कुटुंबाला शासनाकडून मिळणारी पाच लाख रुपयांची मदत तात्काळ मंजूर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

▶▶ पान २ वर

# मनीषा हवालदारला ६ दिवसांची तर प्रल्हाद कुलकर्णीला २ दिवसांची कोठडी

नवी दिल्ली । प्रतिनिधी

नीट पेपरफुटी प्रकरणात सोमवारी (दि.२५) सीबीआयने आरोपी मनीषा हवालदार, प्रल्हाद कुलकर्णी आणि मनीषा वाघमारेला सीबीआय न्यायालयात हजर केले. तिघांपैकी मनीषा हवालदारला ६ दिवसांची सीबीआय कोठडी तर प्रल्हाद कुलकर्णीला ४८ तासांची सीबीआय कोठडी




सुनावली आणि मनिषा वाघमारेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. सकाळी सर्वप्रथम मनीषा हवालदारला तर दुपारनंतर प्रल्हाद कुलकर्णी आणि मनिषा वाघमारेला न्यायालयात हजर करण्यात आले होते. दोन सुनावण्या स्वतंत्र पार पडल्या.

भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या भाषांतराशी संबंधित प्राध्यापक मनिषा हवालदारला न्यायालयासमोर सकाळी सादर करण्यात आले. सुनावणीदरम्यान

▶▶ पान २ वर

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कारांचे वितरण

## कोश्यारी, धर्मेंद्र, अलका याज्ञिक, शिबू सोरेन यांच्यासह १३१ मान्यवरांचा सन्मान

दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेल्या प्रतिष्ठित पद्म पुरस्कारांचे आज राष्ट्रपती भवनात आयोजित एका समारंभात वितरण करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत देशासाठी अद्वितीय आणि उल्लेखनीय योगदान देणाऱ्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांना पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या पुरस्कारांमध्ये यंदा चित्रपट सृष्टीतील दिग्गज दिवंगत अभिनेते धर्मेंद्र आणि ज्येष्ठ नेते शिबू सोरेन यांच्यासह देशातील एकूण १३१ मान्यवरांचा समावेश आहे.

चालू वर्षासाठी एकूण १३१ पद्म पुरस्कारांना मंजुरी देण्यात आली होती. यामध्ये पाच पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये महिलांचे आणि समाजाच्या विविध स्तरांतून पुढे आलेल्या व्यक्तींचे लक्षणीय प्रमाण दिसून येत आहे. या संपूर्ण यादीत १९ महिलांना सन्मानित करण्यात आले असून, आपापल्या क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी करणाऱ्या १६ व्यक्तींना मरणोत्तर हा बहुमान प्रदान करण्यात आला आहे. यासोबतच जागतिक पातळीवर हिंदुस्थानचे नाव उंचावणाऱ्या

▶▶ पान २ वर

# महागाई नियंत्रण करता येत नसेल तर खुर्ची सोडा–हर्षवर्धन सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

सत्तेत आल्यास पेट्रोल डिझेल ३५ रुपये लिटरने देऊ अशा राणा भिमदेवी थाटात घोषणा करणारे मागील १२ वर्षापासून सत्तेत असताना पेट्रोल–डिझेल–एलपीजी सिलेंडरच्या किंमती गगमाला भिडलेल्या आहेत. मागील ११ दिवसातच पेट्रोल डिझेलच्या किमती ८ रुपये प्रति लिटरने



वाढवलेल्या आहेत. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून सरकारने तात्काळ मागे घ्यावी आणि महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, असा घणाघाती हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

इंधन दरवाढीवर भाजपा सरकारचा

▶▶ पान २ वर

# राज्यात पाच हजार सहा.प्राध्यापक भरतीला मंजुरी

## आरक्षण अंमलबजावणीसाठी विशेष प्रशिक्षण

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी पाच हजार १२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. ही भरती करताना विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना बिनचूक आरक्षण धोरण अंमलबजावणी करता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेत एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून स्वायत्त महाविद्यालयांना, तर शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न अन्य महाविद्यालयांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांकरिता लागू करण्यात आले. शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने पदभरतीबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेता, महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरणे आवश्यक होते. या अनुषंगाने राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी पाच हजार १२ रिक्त पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने सामाजिक आणि समांतर आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील उपकुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिव (मागास वर्ग कक्ष) यांच्याकरिता हे प्रशिक्षण झाले. प्रशिक्षणाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले. महाराष्ट्र अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक आणि उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कोल्हापूरचे विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, नाशिक महसूल विभागीय कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी संदीप पाटील, पुणे महसूल विभागीय कार्यालयाचे सहाय्यक महसूल अधिकारी इक्बाल दरवाजकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. दिलीप भरड, उच्च शिक्षण संचालनालयाच्या सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे, प्रशासन अधिकारी डॉ. सुयश दुसाने आदी

▶▶ पान २ वर

## पालघर अपघात : मृतांच्या वारसांना पाच लाखाची मदत

पालघर । वृतसंस्था

जिल्ह्यातील धानिवरी येथे १८ मे रोजी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या १३ नागरिकांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेनंतर एकूण ६५ लाख रुपयांच्या मदतीची रक्कम जिल्हाधिकारी, पालघर यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत वितरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून संबंधित प्रशासकीय आदेशही जारी करण्यात आले आहेत. १८ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या दरम्यान डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात टेम्पो आणि कंटेनरच्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला होता.

cmyk

अग्रलेख

# पराभवात संयम, विजयात विनम्रता!

राजकारणात विजय आणि पराभव हे कायमस्वरूपी नसतात. जनतेच्या कौलावर उभ्या असलेल्या लोकशाहीत कधी सत्ता मिळते, तर कधी विरोधी बाकांवर बसण्याची वेळ येते. त्यामुळेच पराभव उदारपणे आणि विजय विनम्रपणे स्वीकारण्याची परंपरा लोकशाहीत महत्त्वाची मानली जाते. कारण जनतेला केवळ आक्रमक राजकारण नको असते; तिला परिपक्वता, सभ्यता आणि जबाबदारीची जाणीव असलेले नेतृत्व अपेक्षित असते. ही मर्यादा ओलांडली की जनतेचा विश्वास डळमळीत होऊ लागतो आणि त्या पक्षाच्या राजकीय भवितव्यालाही तडे जाऊ शकतात.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांनी विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीसमोर अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांना अपेक्षित यश मिळाले नाही, तर तमिळनाडूत स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील पक्षालाही धक्का बसला. या पराभवांमुळे विरोधी आघाडीत नैराश्याचे वातावरण असणे स्वाभाविक आहे. तथापि, केरळमध्ये काँग्रेसने सत्ता मिळवणे आणि तमिळनाडूत तब्बल ५९ वर्षांनंतर काँग्रेसचा पुन्हा सत्तेत सहभाग होणे या त्यांच्या जमेच्या बाजू मानाव्या लागतील. परंतु राजकीय यश आणि अपयश या दोन्ही गोष्टींचा स्वीकार करताना आवश्यक असलेली सभ्यता अनेक नेत्यांच्या वर्तनातून दिसत नाही, ही चिंतेची बाब आहे. तमिळनाडूच्या राजकारणात मात्र परिपक्वतेचे उदाहरण पाहायला मिळाले. स्टॅलिन यांच्या पुत्राने काहीशी असंयमी भूमिका घेतली असली, तरी स्वतः स्टॅलिन यांनी संयम दाखवला. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, त्यांचा पराभव करून सत्तेत आलेल्या विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर स्टॅलिन यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. ही कृती भारतीय लोकशाहीतील राजकीय संस्कारांचे प्रतीक मानावी लागेल. मतभेद असू शकतात, परंतु वैर नसावे हा संदेश त्यांनी दिला. याउलट काही नेत्यांच्या भूमिकांमधून अस्थिरता आणि असंयम प्रकर्षाने दिसत आहे. ममता बॅनर्जी यांना पराभवानंतर संयम राखता येत नसल्याचे जाणवते, तर राहुल गांधी यांना विजयानंतर आवश्यक असलेली संतुलित भूमिका घेणे जमत नसल्याचे दिसते. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने सत्ता हस्तगत केलेली नसतानाही त्यांनी पिछाडीवरून मुसंडी मारत शंभरी गाठली, हे निश्चितच पक्षासाठी उत्साहवर्धक होते. पण विरोधी बाकांवर बसणे हीदेखील मोठी जबाबदारी असते, याचे भान पक्ष नेतृत्वाने ठेवायला हवे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांची भूमिका सरकारच्या धोरणांवर टीका करणे, प्रश्न उपस्थित करणे आणि सत्ताधाऱ्यांची चूक जनतेसमोर आणणे हीच आहे. लोकशाहीत ती अपेक्षितदेखील असते. परंतु टीका करताना भाषेची मर्यादा पाळली जाणे अत्यावश्यक असते. अलीकडील भाषणांत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केलेली टीका ही अत्यंत विखारी आणि आक्रमक स्वरूपाची होती. राजकीय विरोध असणे स्वाभाविक असले, तरी व्यक्ती आणि पदाचा सन्मान राखण्याची परंपरा भारतीय राजकारणात कायम राहिली आहे. त्या तुलनेत राहुल गांधी यांची भाषा अनेकांना धक्कादायक वाटली. राजकीय टीका आणि वैयक्तिक आक्रमण यामधील सीमारेषा पुसली गेली तर लोकशाहीची गुणवत्ता खालावते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यावर टीका करताना ''मेलोडी'' आणि ''मिझरी'' या शब्दांचा वापर करून सरकारवर उपरोधिक पण मर्यादित प्रहार केला. त्याचप्रमाणे संतुलित टीका राहुल गांधी यांनाही करता आली असती. परंतु त्याऐवजी ते अनेकदा वादग्रस्त विधानांच्या माध्यमातून चर्चेत राहतात. विशेष म्हणजे पंतप्रधान परदेश दौऱ्यावर असताना किंवा स्वतः राहुल विदेशात असताना अशी विधाने वारंवार होत असल्याने त्यांच्या राजकीय टायमिंगवरही प्रश्न उपस्थित होतात. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलेले विधान विशेष महत्त्वाचे ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी राजकीय मतभेद असले, तरी पंतप्रधान म्हणून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिष्ठा राखण्याचे काम करत आहेत, हे विसरून चालणार नाही, असे पवार यांनी स्पष्ट केले. विरोधकांनी सरकारवर टीका करावी, पण ती देशहिताच्या चौकटीत राहून व्हावी, हा त्यामागील संदेश होता. पवार यांनी यावेळी इंदिरा गांधी यांच्या रशिया दौऱ्यातील एका प्रसंगाची आठवण करून दिली. ''मी भारतातील ४० कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करते आणि त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लागला तर ते सहन करणार नाही,'' असे इंदिरा गांधी यांनी रशियन अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. हा प्रसंग भारतीय नेतृत्वातील राष्ट्रीय अभिमान आणि जबाबदारीची जाणीव अधोरेखित करणारा आहे.

भारतीय संसदीय परंपरेत सभ्यता आणि परस्पर आदर यांची अनेक उदाहरणे आढळतात. दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांनी पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्याविषयी अनेकदा आदरपूर्वक उद्गार काढले. संसदेवर हल्ला झाला तेव्हा सोनिया गांधी आणि वाजपेयी यांनी परस्परांची आत्मीयतेने विचारपूस केल्याची आठवणही त्यांनी सांगितली होती. मतभेद असूनही राष्ट्रीय प्रश्नांवर एकत्र उभे राहणे, ही भारतीय लोकशाहीची खरी ताकद होती. आजच्या राजकारणात हीच प्रगल्भता दुर्मिळ होत चालल्याचे दिसते. राहुल गांधी यांच्या भगिनी प्रियंका गांधी यांनी संसदीय राजकारणात नुकताच प्रवेश केला असला, तरी त्यांच्या भाषणांत आणि सार्वजनिक संवादात संयम व सौजन्य दिसते. सर्वपक्षीय बैठकीत पंतप्रधान मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी त्यांनी केलेला सहज संवाद भारतीय लोकशाहीतील सुसंस्कृततेचे उदाहरण मानले गेले.

राजकारण हे संघर्षाचे मैदान असले, तरी ते शत्रुत्वाचे रणांगण नसते. लोकशाहीत विरोधक हा शत्रू नसून पर्यायी विचारांचा प्रतिनिधी असतो. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचा सन्मान राखणे जितके आवश्यक आहे, तितकेच विरोधकांनीही सरकार आणि घटनात्मक पदांचा आदर राखणे गरजेचे आहे. कारण पंतप्रधान हे केवळ एखाद्या पक्षाचे नसतात; ते देशाचे प्रतिनिधित्व करतात. त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेताही केवळ एका पक्षाचा नसून जनतेच्या मोठ्या वर्गाचा आवाज असतो. भारतीय लोकशाहीचा दर्जा टिकवायचा असेल तर राजकीय भाषेतील कटुता कमी होणे आवश्यक आहे. जनतेला संघर्ष हवा असतो, पण तो विचारांचा; वैयक्तिक द्वेषाचा नव्हे. विजयात विनम्रता आणि पराभवात संयम राखणारे नेतृत्वच दीर्घकाळ जनमानसात स्थान मिळवते. अन्यथा टाळ्यांच्या गजरात सुरू झालेला प्रवासही लोकांच्या नाराजीने अकाली संपुष्टात येऊ शकतो.

# अधिक मासानिमित्त भव्य दिव्य महिला कीर्तन महोत्सव व देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थानवर प्रति तीन वर्षाप्रमाणे याही वर्षी सौ. सुनंदानताई सतीश महाराज उरणकर यांच्या नियोजनात व ह.भ.प. संगिताताई सोळसकर यांच्या नेतृत्वाखाली दि २४ मे ते ३१ मे दरम्यान भव्य दिव्य महिला कीर्तन महोत्सव व देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध कथाकार ह.भ.प. अंजलीताई दिघे आळंदीकर यांच्या रसाळ वाणीतून देवी भागवत कथा होणार आहे. विशेष म्हणजे यावर्षी हा तपपूर्ती सोहळा म्हणून साजरा होत असल्याने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या उत्साहात जय्यत तयारी सुरु आहे.**



प्रति तीन वर्षानी होत असलेल्या या सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा सकाळी ९ ते १० तुलसी अर्चन, १०-३० ते १२. गाथाभजन, ते १२ ते १ भोजन प्रसाद, दुपारी १ ते ४ देवी भागवत कथा, ४.३० ने ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ कीर्तन, ९ ते १० भोजन प्रसाद १० ते १२ संगीत भजन व त्यानंतर हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. यामध्ये दि.२४ रोजी स्वरगंध ह. भ.प.संगिताताई सोळसकर, दि २५ रोजी भागवतकार ह.भ.प. प्रतिक्षाताई जाधव-गिरमकर शिर्डी, दि. २६ रोजी ह.भ.प. शिवांजलीताई जरांगे, दि.२७ रोजो स्वरभूषण ह. भ.प. योगिताताई हजारे आहिल्यानगर, दि २८ रोजी ह. भ.प. रेणुकाताई पाखरे आळंदी, दि. २९ रोजी ह.भ.प.सौ. माईसाहेब धर्मराज म.पाटील सामनगांवकर, दि.३० रोजी ह.भ. प. रजनीताई जाधव नाशिक, यांची कीर्तन सेवा होणार आहे. तर दि.३१ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत प्रसिद्ध कथाकार ह. भ. प. कविताताई साबळे शिर्डी यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर कै. जनाबाई विठ्ठठराव चव्हाण यांचे स्मरणार्थ सौ. मिराताई सुदर्शन चव्हाण (वामनभाऊ ट्रेडर्स) यांच्या वतीने काला महापंगत प्रसाद होणार आहे. पाटोदा पंचक्रोशीत होत असलेल्या या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सर्वच कार्यक्रमाचे नियोजन महिला मंडळकडून केले जाते गेला पंधरा वर्षापासून या संस्थानवर महिलाना शंभर टक्के जणू आरक्षणच असते. यातून स्त्री शक्तीचा जागर व सात दिवस आखंड-हरिनामाच्या गजरा चा नाद परिसरात घुमत राहतो. या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत व गुणवंत कीर्तनकारांबरोबरच प्रसिद्ध पखवाजवादक ह.भ.प.ज्ञानेश्वरीताई जगताप (बोधेगावकर) त्याना ह.भ.प. गिताताई उरणकर साथ करणार आहेत. तर ह. भ.प.अंकिताताई मस्के या हार्मोनियम साथीला आहेत. याबरोबरच गायिका म्हणून ह.भ.प. शिवनंदाताई पांचाळ (जिंदूर), ह.भ.प. आक्काताई गावले (परंडा), ह.भ.प.- देवलीताई भालेकर (आळंदी), तर सरभूषण ह.भ.प. योगिताताई हजारे व स्वरगंध ह. भ. प. सगिताताई सोळसकर यांचीही गायन साथ राहणार आहे . यामध्ये विशेष म्हणजे दररोज सकाळी ९ ते १० तुलसी अर्चन होणार असल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणान महीला सहभागी होत असतात-तर हरिपाठ, कीर्तनाचाही आनंद घेत असतात. पाटोदा पंचक्रोशीतील महिला मंडळ व भजनीमंडळाच्या आयोजकात होत असलेल्या या सोहळ्याचा, व ज्ञानदानाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लभ घ्यावा असे आवाहन श्री विठल रुक्मिणी संस्थाण विठ्ठलनगर व भक्तगणांकडून करण्यात येत आहे.

# दिव्यांग व्यक्तीने शासनाच्या योजनेचा लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी मित्तल

जालना । प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तींना सक्षम व स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालय जालना, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय व रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आज जिल्हा परिषद प्रशाला, स्टेशन रोड येथे जालना जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, कृत्रिम पाय तसेच पोलिओग्रस्त व्यक्तींना कॅलिपर्सचे वाटप विशेष सहाय्य वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिराला दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, जवळपास ८० लाभार्थ्यांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत योग्य नियोजन व उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित दिव्यांग बांधवांनी प्रशासनाच्या या संवेदनशील उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. यावेळी जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. तसेच बुधवार, दि. २६ मे २०२६ रोजी हे विशेष शिबिर सुरू राहणार असून अधिकाधिक दिव्यांग बांधवांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी केले. यावेळी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री. खरात यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

# पाण्यासह हक्काच्या प्रश्नावर निघणाऱ्या दि २९ रोजी च्या बैलगाडी मोर्चाला शेकापचा पाठींबा-भाई मोहन गुंड

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी बीड जिल्ह्यातील शेतकरी रस्त्यावर उतरत आहेत. ''पाणी आपल्या हक्काचं... नाही कोणाच्या बापाचं'' या जोरदार घोषणेने लोकलढा आंदोलन, बीडच्या वतीने येत्या २९ मे २०२६, शुक्रवारी सकाळी १० वाजता भव्य 'बैलगाडी मोर्चा' काढण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा लढा शेतकऱ्यांनाच लढावा लागणार आहे या मोर्चाला शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड सहभागी होणार असून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.**

बीड शहरातील सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स ते जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या मार्गावर हा मोर्चा निघणार असून, जायकवाडी धरणातील हक्काच्या पाण्यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रशासनाला धारेवर धरण्यात येणार आहे. पाण्याविना शेती, शेतीविना रोजगार ''पाण्याविना शेती गेली, शेतीविना रोजगार गेला, रोजगाराविना प्रगती गेली आणि प्रगतीविना संसार उध्वस्त झाले. हे सर्व अरिष्ट शेतीला हक्काचे पाणी नसल्याने झाले आहे, प्रमुख मागण्या काय? लोकलढा आंदोलनाने या मोर्चाच्या माध्यमातून सहा प्रमुख मागण्या १) कोकणातील १६८ पाणी



नदीजोड प्रकल्पातून नियोजित वेळेत जायकवाडी धरणात आणून बीड जिल्ह्यातील शेतीला द्यावे. २) गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालव्याचा तातडीने सर्वे करावा. ३) कोकणातून येणाऱ्या १६८ पाण्यात बीड जिल्ह्याच्या वाट्याला किती पाणी येणार, याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तात्काळ तयार करावा. ४) गेवराई तालुक्यातील उजवा कालवा व माजलगाव धरणाला जायकवाडीतून मिळणारे पाणी कमी केले आहे, ते पूर्ववत करावे ५.) बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गतवर्षीचा पीकविमा तातडीने द्यावा ६) जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सरसकट व संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी. मराठवाड्याच्या तहानेवर वर्षानुवर्षे राजकारण झाले. आता शेतकरी जागा झाला आहे. आपला लढा आपल्यालाच लढावा लागेल,'' असे आवाहन आयोजकांनी केले आहे. बैलगाडी, ट्रॅक्टर, नांगर घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. या मोर्चात जिल्हाभरातून शेकापचे कार्यकर्ते सहभागी होणार आहेत अशी माहिती जिल्हा चिटणीस अॅड नारायण गोले पाटील, भाई बापूसाहेब सोळुंके यांनी दिली आहे , प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा लोकलढा आंदोलनाच्या आयोजकांनी दिला आहे.

## पान १ वरून...

### खरीप तोंडावर खत

टन डीएपी आणि ९ लाख टन एनपीके कॉम्प्लेक्स खतांची व्यवस्था केली असल्याचेही शर्मा यांनी सांगितले. त्यामुळे खरीप हंगामातील मागणी पूर्ण करण्यात मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, पश्चिम आशियातील तणावामुळे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने काही भागांत खत पुरवठ्यावर परिणाम जाणवू लागला आहे. त्यामुळे खरीप पेरणीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. खत उत्पादनासाठी आवश्यक कच्च्या मालाचाही पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगत शर्मा यांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा केला. खत विभागाकडून परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात असून सचिवांच्या अधिकारप्राप्त गटाच्या आतापर्यंत नऊ बैठका झाल्या आहेत. तयार खतांचा तसेच कच्च्या मालाचा साठा नियमित तपासला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, २०२५ मध्ये देशाच्या एकूण खत गरजेपैकी जवळपास ७३ टक्के गरज देशांतर्गत उत्पादनातून भागवण्यात आली. युरिया, डीएपी, एनपीके आणि एसएसपी खतांचे उत्पादन २०२१ मधील ४३३.२९ लाख टनांवरून २०२५ मध्ये विक्रमी ५२४.६२ लाख टनांपर्यंत वाढले आहे. देशातील युरिया उत्पादनातही मोठी वाढ झाली आहे. २०१४-१५ मध्ये २२५ लाख टन असलेले उत्पादन २०२४-२५ मध्ये ३०६.६७ लाख टनांपर्यंत पोहोचले. मात्र वाढती मागणी लक्षात घेता मागील आर्थिक वर्षात देशाला १०० लाख टनांहून अधिक युरिया आयात करावा लागला. दरम्यान, २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात खत अनुदानासाठी १.७१ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र जागतिक बाजारातील वाढत्या दरांमुळे खत आयात खर्च वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

--------------

### शिल्पा शेट्टीच्या उपस्थित

सेहर भामला, शाळेचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर बोलताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, ''वाढत्या शहरीकरणात आपल्या शहराला हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक झाड म्हणजे हजारो लोकांना ऑक्सिजन. डी. वाय. पाटील स्कूल आणि भामला फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांना आवाहन करताना त्या म्हणाल्या,''फक्त झाड लावून थांबू नका, तर त्याचे संगोपनही करा. प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड दत्तक घेऊन मोठे करावे. चला, आपण सर्वांनी मिळून अधिकाधिक झाडे लावूया आणि त्यांचे संगोपन करून येणाऱ्या पिढीला सुरक्षित भविष्य देऊया,'' असे आवाहन मुंडे यांनी यावेळी केले. यावेळी पंकजाताई मुंडे व मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या आवारात आणि लगतच्या परिसरात वड, पिंपळ, कडुनिंब, करंज, बहावा अशा देशी प्रजातींच्या विविध रोपे लावण्यात आली. भामला फाउंडेशनतर्फे पुढील तीन वर्षे या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यात आली आहे.

-----------

### विधान परिषद निवडणूक:महायुतीतील

जाणार असल्याचे समजते. या पार्श्वभूमिवर शनिवारी भाजपचे नेते, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी शिवसेनेचे प्रमुख नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नंदनवन येथे भेट घेऊन चर्चा केली. मात्र, जागावाटपावर कोणताही तोडगा न निघाल्याने ही चर्चा निष्फळ ठरली होती. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी, पत्रकारांशी बोलताना महायुतीच्या रखडलेल्या जागावाटपासंदर्भात भाष्य केले. जागावाटपाबाबत आमच्या मित्र पक्षांशी चर्चा सुरु आहे. शिवसेनेशी नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर, तर राष्ट्रवादीसोबत पुण्याच्या विधानपरिषदेच्या जागेबाबत चर्चा केली जात आहे. अजून मार्ग निघालेला नाही. मात्र, आम्ही तिघेही एकत्र बसून मार्ग काढू. या चर्चेतून नक्कीच मार्ग निघेल असा मला विश्वास आहे असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

-------------

### मनीषा हवालदारला ६ दिवसांची तर

सीबीआयच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, भौतिकशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका मनिषा हवालदार हिच्याकडे आली होती आणि तिच्याकडूनच प्रश्नपत्रिकेचे सर्क्युलेशन झाल्याचे समोर आले आहे. तसेच आर्थिक फायद्यासाठी काही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका पुरवल्याचा संशय असल्याचेही सांगण्यात आले. या संपूर्ण गोष्टींचा तपास करण्यासाठी ६ दिवसांची सीबीआय कोठडीची मागणी करण्यात आली. दुसरीकडे, आरोपीच्या वकिलांनी या आरोपांना विरोध करताना मनिषा हवालदार केवळ भौतिकशास्त्र विषयाची भाषांतराचे काम करत होती. आम्ही तपासाला पूर्ण सहकार्य करत आहोत. आतापर्यंत तिच्याविरोधात ठोस काहीही समोर आलेले नाही,'' असाही दावा त्यांनी केला. तसेच आपल्या अशिलाशी चर्चा करण्यासाठी वेळ देण्याची विनंतीही बचाव पक्षाने न्यायालयाकडे केली, न्यायालयाने ही विनंती मान्य केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर विशेष सीबीआय न्यायालयाने मनिषा हवालदारला ६ दिवसांची सीबीआय कोठडी दिली. दरम्यान, मनिषा हवालदारच्या पतीला भेटीची परवानगी देण्याची विनंती बचाव पक्षाने केली होती मात्र न्यायालयाने ती मागणी फेटाळून लावली. दुपारी नीट पेपरफुटी प्रकरणातील आरोपी प्रल्हाद कुलकर्णी आणि मनिषा वाघमारेला सीबीआय न्यायालयात हजर करण्यात आले. दोघांचीही सीबीआय कोठडी संपत असल्याने त्यांना न्यायालयासमोर सादर करण्यात आले होते. सीबीआयने आरोपी प्रल्हाद कुलकर्णीच्या चौकशीसाठी आणखी दोन दिवसांची कोठडी मागितली. तपासाच्या दृष्टीने काही बाबींची पडताळणी बाकी असल्याचे सीबीआयकडून न्यायालयात सांगण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर विशेष सीबीआय न्यायालयाने प्रल्हाद कुलकर्णीला ४८ तासांची सीबीआय कोठडी मंजूर केली. तर या प्रकरणातील दुसरी आरोपी मनिषा वाघमारे हिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. सुनावणीदरम्यान, प्रल्हाद कुलकर्णीच्या वकिलांनी सीबीआय कोठडीच्या मागणीला विरोध केला. आरोपीला यापूर्वीच दहा दिवसांची सीबीआय कोठडी देण्यात आली होती. तपासासाठी आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे गोळा करण्यात आले आहेत. १४ मे रोजी अटक झाल्यानंतर तपास पूर्ण झाला असून, आता केवळ कोठडी वाढवून घेण्यासाठी ही मागणी केली जात आहे,'' असा दावा बचाव पक्षाने केला. या संदर्भात माध्यमांशी बोलताना आरोपी मनीषा वाघमारेचे वकील अॅड. श्रेयस गच्चे म्हणाले की, सुनावणी दरम्यान मी मनिषा वाघमारेची बाजू मांडली. त्यांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली. त्यांच्यावर नीट परीक्षेच्या पेपरचा काही भाग फॉरवर्ड केल्याचा आरोप आहे. आम्ही जामिनासाठी अर्ज करणार आहोत. सीबीआय जो पर्यंत आरोपपत्र दाखल करत नाही तोपर्यंत आरोप हे केवळ आरोप आहेत.

**पेपरफुटीचे एनटीएला गांभिर्य नाही – सर्वोच्च न्यायालय**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) कडून वारंवार होणाऱ्या पेपर लीकच्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाने दिलेल्या अनेक निर्देशांनंतरही एजन्सी भूतकाळातील वादांमधून कोणताही धडा शिकलेली नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, एनटीए आणि केंद्रीय अन्वेषण ब्यूरोकडून उत्तर मागवले आहे. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालय म्हणाले, ''हे अत्यंत खेदजनक आहे. पेपरफुटीप्रकरणी त्यांनी (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) अजूनही कोणताही धडा घेतलेला नाही, आम्ही यासाठी एक समिती देखील स्थापन केली होती.'' फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन आणि युनायटेड डॉक्टर्स फ्रंट यांनी आपल्या याचिकेत एनटीए बदलण्याची किंवा तिच्या रचनेत पूर्णपणे सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

---------

### वीज पडून एकाचा मृत्यू

परतूर तालुक्यातील चिंचोली,मापेगाव, सालगाव,येथे आलेल्या चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक घरांवरील पत्रे उडून गेली आहेत. तसेच शेतकऱ्यांचे सोलर प्लांट देखील वादळी वाऱ्यामुळे नुकसानग्रस्त झाले आहेत. आ. बबनराव लोणीकर यांनी या घटनेची तात्काळ दखल घेत परतूर तहसीलदार, मंठा तहसीलदार, परतूर तालुका कृषी अधिकारी, एचडी कृषी अधिकारी तसेच एसडीएम परतूर यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना योग्य ती नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिक व शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले असून प्रशासनाने त्वरित मदत करून नुकसानग्रस्तांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

-----------

### महागाई नियंत्रण करता येत नसेल

खरपूस समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, इराण युद्धाचे नाव पुढे करून केलेली दरवाढ ही दिशाभूल करणारी आहे. गेल्या १२ वर्षांत नरेंद्र मोदी सरकारने, पेट्रोलच्या किमती ३८ टक्क्यांनी, तर डिझेलच्या किमती ६२ टक्क्यांनी वाढवल्या आहेत, त्यावेळी तर इराण – इस्त्राईलचे युद्ध नव्हते. पेट्रोल डिझेलच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील क्रूड ऑईलच्या दरानुसार ठरतात हे सर्वांनाच माहित आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या कार्यकाळात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले असतानाही, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती ७२ रुपये लिटरच्या वर जाऊ दिल्या नाहीत. महागाईचा भार डॉ. मनमोहनसिंह यांनी जनतेवर पडू दिला नाही. पण मोदी सरकारच्या काळात कच्च्या तेलाचा भाव ५०-५५ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास रेंगाळत होता तेव्हाही पेट्रोल १०० च्या आसपास विकले जात होते. आतातर नरेंद्र मोदी सरकार इथेनॉलमिश्रित निकृष्ट दर्जाचे पेट्रोल ११० रुपये प्रति लिटर दराने विकत आहे. गेल्या १२ वर्षांत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील कर आणि उत्पादन शुल्काच्या माध्यमातून जनतेच्या खिशातून ४३ लाख कोटी रुपयांचा नफा कमावला आहे आणि मागील चार पाच दिवसात केलेल्या चार रुपयांच्या दरवाढीतून भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन, या कंपन्यांनी काही तासांतच बाजारातून १२,४०० कोटींची कमाई केली. ही नफेखोरी जनतेच्या खिशावर दरोडा टाकून केलेली आहे. काँग्रेस सरकारच्या वेळी १-२ रुपयांनी पेट्रोल दरवाढ झाली की भाजपाचे नेते रस्त्यावर उतरत बोंबा मारत होते, मग आता महागाईवर गप्प का, असा सवालही यावेळी उपस्थित केला. पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्यात पेट्रोल-डिझेलचा साठा मुबलक आहे असा दावा भाजपा सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत. साठा असेल तर राज्यातील विविध भागात पेट्रोल पंपावर रांगा का लागल्या आहेत?, यावरील भाजपा नेत्यांचे उत्तरही अत्यंत हास्यास्पद आहे. पेट्रोल डिझेलचा साठा केल्याने टंचाई निर्माण होत आहे, असे अत्यंत बेजबाबदार व अत्यंत निर्लज्जपणाचे विधान भाजपाचे नेते करत आहेत. हे विधान जबाबदारीपासून पळ काढणारे व जनतेच्या डोळ्यात धुळफेक करणारे आहे. जनता मुर्ख नाही, हे भाजपाच्या नेत्यांनी लक्षात ठेवावे, असा सूचक इशाराही यावेळी दिला.

**काँग्रेसचे आजपासून आंदोलन**

हर्षवर्धन सपकाळ यांनी इशारा दिला की, नरेंद्र मोदी सरकारने केलेल्या पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीवर जनतेत तीव्र संताप आहे. सरकारने ही दरवाढ मागे घ्यावी या मागणीसाठी व जनतेची सुरु असलेली लूट थांबवावी या मागणीसाठी काँग्रेस पक्ष विविध विभाग, सेल व संघटनांच्या माध्यमातून मंगळवार २६ मे २०२६ पासून प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला.

----------

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते

व्यक्तींचाही यात समावेश आहे. यामध्ये हिंदी चित्रपटसृष्टीचे 'ही-मॅन' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्कारानाने सन्मानित करण्यात आले. संगीत आणि प्रादेशिक चित्रपटसृष्टीतील योगदानाचा आदर करत प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक आणि मल्याळम चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार ममूटी यांना 'पद्मभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यासोबतच चित्रपट, मालिका आणि रंगभूमीवर आपल्या अभिनयाची जादू दाखवणाऱ्या अनेक कलाकारांची 'पद्मश्री' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. यामध्ये आपल्या अष्टपैलू अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे दिवंगत अभिनेते सतीश शाह यांना मरणोत्तर 'पद्मश्री' देण्यात आला. अभिनेता आर. माधवन यांनाही त्यांच्या '३ इडियट्स' आणि 'रॉकेट्री' सारख्या उत्कृष्ट चित्रपटांमधील कामासाठी 'पद्मश्री'ने गौरविण्यात येणार आहे. तसेच, पाच दशकांहून अधिक काळ बंगाली चित्रपटसृष्टी गाजवणारे आणि ३५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम करणारे सुपरस्टार प्रसेनजित चॅटर्जी, अभिनय क्षेत्रासोबतच विज्ञान व शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारे 'इशकजादे' फेम ज्येष्ठ अभिनेते अनिल कुमार रस्तोगी आणि सहा दशकांहून अधिक काळ रंगभूमी गाजवणारे व सध्या 'अनुपमा' मालिकेत बाबूजींच्या भूमिकेत दिसणारे ज्येष्ठ अभिनेते-दिग्दर्शक अरविंद वैद्य यांनाही यावर्षीचा 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाला आहे. कला क्षेत्रातील या दिग्गजांच्या सन्मानामुळे संपूर्ण मनोरंजन विश्वातून आनंदाचा वर्षाव होत आहे.

--------------------

### राज्यात पाच हजार सहा.प्राध्यापक

उपस्थित होते. पदभरतीची बिंदुनामावली प्राथमिक तपासणी, सामाजिक आरक्षणासोबत महिला आणि दिव्यांग यांचे समांतर आरक्षण अचूकपणे कसे राबवावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. देवळाणकर यांनी प्रास्ताविक केले.

--------------

**कोर्ट. विद्यमान, श्री. रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी**
**रा.मा.क्र./जन्म-मृत्यु, नोंद/२०२६/२७/३४४**

**जाहीरनामा**

मौजे - बोरगाव खु.तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती/कुं. तन्वीर अब्बास बागवान, राह. बोरगाव खु. तह. घनसावंगी, जि. जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे स्वतःचे नावे तन्वीर अब्बास बागवान याचा जन्म दि.२५/०१/१९९० रोजी मौजे बोरगाव खु.येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करुन ग्रामपंचायत, बोरगाव खु. ता. घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना स्वताःचे नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे, नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २०/५/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तालुका दंडाधिकारी, घनसावंगी**

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २६ मे २०२६



## थोडक्यात

### सर्व कर्मचाऱ्यांनी ई-केवायसी पुर्ण करावी -जिल्हा कोषागार अधिकारी

बीड । प्रतिनिधी

सर्व प्रशासकीय विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी-कर्मचारी यांनी माहे मे-२०२६ देय जुन-२०२६ च्या वेतन देयकाअगोदर ई-केवायसी पूर्ण करुन घ्यावी. ही ई-केवायसी पूर्ण करण्याअगोदर बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करुन बँक खाते अद्यावत करण्यात यावे, तसेच सेवार्थ प्रणालीत नोंदविलेला पॅन क्रमांक चूकीचा असल्यास, नोंदविण्यात आलेला पॅन क्रमांकाची दुरुस्ती करुन अद्यावत करावा. ई-केवायसी पूर्ण केल्यानंतर माहे मे-२०२६ देय जुन-२०२६ या महिन्याचे वेतन आहरीत करण्यात येतील, असे प्र. जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### भर उन्हाळ्यातही वनपरीक्षेत्र हिरवेगार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात पाण्याची टंचाई भासत असताना वनविभागाने 'पानवटे' आणि 'बोर' च्या माध्यमातून हरितक्रांती घडवली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी सौ. शिंगटे मॅडम यांच्या संकल्पनेतून डोंगराळ भागात बोर घेऊन,सिमेंटचे पानवटे बांधून त्यात भर उन्हाळ्यात टँकरने पाणी सोडले जात आहे. यामुळे मे महिन्याच्या ४५ तापमानातही झाडे हिरवीगार राहिली असून वनक्षेत्रात 'कोकणात गेल्याचा फील' येत आहे.

वन सर्वे क्र. २६ व ८८ मध्ये वनविभागाने ३ मीटर व्यासाचे गोल सिमेंट पानवटे बांधले आहेत. एप्रिलमध्ये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मे महिन्यात टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू आहे. एक पानवटा ५००० लिटर पाणी साठवतो व त्याचा २००-३०० झाडांना थेट फायदा होतो. ''भर उन्हाळ्यात टँकरनेही काही ठिकाणी पाणी पोहोचवणे जिकिरीचे असते, पण झाडे वाचवण्यासाठी आम्ही ते करतोय,'' असे वनकर्मचाऱ्यांनी सांगितले.

### माजलगाव शहराचा २० वर्षांपासून बाजाराच्या जागेचा प्रश्न कायमच

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील आठवडी बाजाराच्या जागेचा प्रश्न मागील २० वर्षांपासून धूळ खात पडला असून, राजकारण्यांनी जागा उपलब्ध न करता केवळ यात राजकारण आणून हा प्रश्न चिघळत ठेवला.यामुळे येथील बाजार तुटण्याच्या मार्गावर असून, केसापुरी वसाहत येथे मोठ्या प्रमाणावर भरवण्यात येत असतांना नगरपालिका पदाधिकाऱ्यांना अद्याप जाग आलेली नाही.



माजलगाव शहर व तालुक्यातील ४० ते ५० गावांतील ग्रामस्थांसाठी २० वर्षापूर्वी बुधवार व रविवार रोजी हनुमान चौकात बाजार भरत असे. त्यानंतर बाजारासाठी जागा कमी पडत असल्यामुळे हा आठवडी बाजार गजानन मंदिर व बी. अँड सी. रोडवर भरवला जाऊ लागला. येथे भरणारा बाजारदेखील काही राजकीय मंडळींनी उठवून लावण्याचा प्रयत्न केला होता. परंतु शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध पाहता त्या राजकीय मंडळींनी हात टेकले. परंतु गजानन मंदिर रोडवरील भागातील नागरिकांना त्रास होत असल्यामुळे ते न्यायालयात गेले. या भागातील आठवडी बाजार न्यायालयाच्या आदेशाने हटवण्यात आला. त्यानंतर हा बाजार बायपास व बी. अँड सी. रोडवर भरवला जाऊ लागला. या बाजारात बसणाऱ्या शेतकरी व व्यापाऱ्यांकडून नगरपालिका कर वसूल करत असताना शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी पाण्याचीसुध्दा सोय नगरपालिकेकडून केली जात नाही. या ठिकाणी भरत असलेल्या बाजाराला ही जागा पुरत नसून या ठिकाणी कसल्याच प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. ५ ते ६ वर्षांपूर्वी ३८० सर्व्हे नंबरमध्ये बाजार भरवण्याचा प्रयत्न केला असता याला मोठा राजकीय विरोध झाला. त्यानंतर या जागेसंदर्भात न्यायालयाने स्टे दिला.

कोणत्याही निवडणुका आल्या की, राजकीय मंडळी बाजाराच्या जागेचा प्रश्न महत्त्वाचा करत निवडून येतात. निवडून आल्यावर ते हा मुद्दा विसरून जातात. काहीदिवसा पूर्वी शेख मंजूर यांनी नगराध्यक्षाचा पदभार घेतला तेव्हा त्यांनी व आ. प्रकाश सोळंके यांनी आठवडी बाजार न्यायालयाच्या मागे लवकरच भरवणार, असे सांगितले होते.परंतु पाच वर्षानंतरही तो प्रश्न तसाच पडून आहे केसापुरी कॅम्प या ठिकाणी भरत असलेला रोडवरील बाजार अनेकांना जीवघेणा ठरला तर सध्याची परिस्थिती पाहता स्थानिक चालक पादत्राणे तसेच ट्राफिक जाम असे अनेक प्रश्न उपस्थित राहत आहेत.लोक प्रतिनिधींनी या ठिकाणी लक्ष घालायला हवे नगराध्यक्ष असतील किंवा स्थानिक आमदार लोकांसाठी सोयी सुविधा स्वच्छ पाणी आणि स्वच्छता आणि जागा बाजारा साठी उपलब्ध करून देण्यात यावी.परंतु त्यांना याचा विसर पडला की काय, असा प्रश्न नागरिक, व्यापारी व शेतकरी उपस्थित करत आहेत.

# अभियानात वडवणी तालुक्यातून आदर्श 'रुई' गांव ठरले अव्वल

## ग्रामपंचायतीला १५ लक्ष रू.विशेष बक्षीस; उच्चशिक्षित आदर्श सरपंच ॲड. मयूर आंधळे यांच्या कामाची किमया जनसेवेसाठी सार्थक ठरली

वडवणी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०१५-२६ अंतर्गत वडवणी तालुक्यातील तब्बल ९ ग्रामपंचायत कार्यालयाने सहभाग घेतला होता. यामध्ये आदर्श रुई (पिंपळा) गावाने तब्बल प्रथम क्रमांक मिळवला असून शासनाच्या वतीने १५ लक्ष रुपये विशेष बक्षीसचे मानकरी ठरले आहेत. तर सदरील रुई गांव जिल्हास्तरीय स्पर्धेत गेले असून पुन्हा गावचे उच्चभूषित युवा सरपंच अँड. मयुरभैय्या आंधळे यांच्या संकल्पनेतून ग्रामस्थांनी च्या पुढाकाराने पुन्हा एकदा नावलौकिक भरारी घेतली आहे या कामाचे सर्वस्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील एकमेव पुनर्वशीत गाव म्हणून डोंगरपट्ट्यातील मौजे रुई (पिंपळा) संबोधले जाते. या गावची धुरा उच्चशिक्षित व भूषित युवा आदर्श सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांनी साधारण गेल्या दोन-तीन वर्षांपूर्वी गावच्या विकासाचे सूत्रे हाती घेतली. तेव्हापासून गावामध्ये विकासाची गंगा वहती कायम ठेवली आहे. गेल्या दोन ते तीन वर्षात शासनाच्या विविध योजना व विकासात्मक कामे शासन दरबारी मंजूर करून गांवस्तरावर १००% अंमलबजावणी करत प्रत्यक्ष उतरवली आहेत. या कालखंडात अँड. मयूरभैया आंधळे यांनी चांद्यापासून ते बांद्यापर्यंत सर्व गरजू विकासकामे ग्रामस्थांसाठी खुली केली आहेत. या कामाची दखल घेऊनच शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत उच्चस्तरीय समितीने नुकतीच भेट दिली. या भेटीमध्ये केलेल्या विकासात्मक कामाचा गांवचा झालेला कायापलट या सर्व बाबी जाणून घेत त्यांच्या निदर्शनास दिसून आल्या आहेत. त्यामुळे यंदा शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान या कार्यक्रमांतर्गत वडवणी तालुक्यातून अव्वल क्रमांक मिळवण्याचा मान मौजे रुई (पिंपळा) गावाला भेटला आहे. यामध्ये शासनाच्या वतीने १५ लक्ष रुपयाचे विशेष बक्षिसाचे मानकरी देखील रुई ग्रामपंचायत कार्यालय ठरल्याने त्यांचे तालुक्यातून विशेष कौतुक व ग्रामस्थांमधून सरपंच महोदयाचे अभिनंदन होत आहे. या अभियानात वडवणी तालुक्यातील ९ ग्रामपंचायतीने सहभाग नोंदवला होता. तर याची पाहणी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करून हे गाव प्रथम क्रमांकाचे आहे. असे नुकतेच जाहीर केले असून



सदरील रुई (पिंपळ) गाव हे जिल्हास्तरीय अभियानामध्ये दाखल झाले आहे. यामुळे उच्चभूषित आदर्श सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांची गावाबद्दल दूरदृष्टी आणि गांवासाठी असलेली तळमळ आणि केलेले विकास कामे याची किमया आज प्रत्यक्षात शासन दरबारी नोंद होत ग्रामपंचायत कार्याला कार्यालयाला तब्बल १५ लक्ष रुपयांचे मानधनाच्या स्वरूपात बक्षीस मिळवून दिले असल्याने वडवणी तालुक्यात आणि विशेष जिल्ह्यात या गावाने मान उंचावली आहे. हे विशेष म्हणावे लागेल तर या अभियानात सर्वोच्च गुण मिळवून देण्यामध्ये ग्रामस्थांसह राज्य सरकार ग्रामविकास विभाग व जिल्हा प्रशासन व स्थानिक पदाधिकारी तालुका प्रशासन यांचे सर्वांचे आभार सरपंच अँड. मयूरभैया आंधळे व ग्रामपंचायत कार्यालय रुई पिंपळा यांच्या संयुक्त विद्यमानाने आभार देखील मानण्यात आले आहे.

**विशेष आभार -**

बीड जिल्ह्याचे सन्माननीय जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन साहेब, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जतिन रहमान साहेब, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभागात) श्री. काळे साहेब, वडवणी पंचायत समिती चे कर्तव्यदक्ष गट विकास अधिकारी श्री. विठ्ठल नागरगोजे साहेब, सहायक गटविकास अधिकारी श्री. पोहनेरकर साहेब, या योजनेचे जिल्हा समन्वयक श्री. अशोक खरसाडे साहेब, पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी श्री. निरडे साहेब व हजारे साहेब यांचे विशेष आभार..

**सशक्तिकरणाच्या कामे व योजना राबविल्या**

राज्य व केंद्र सरकारच्या वतीने गावस्तरावर अनेक योजना राबवल्या जातात. या योजना गावात ग्रामस्थांच्या सहभागाने शंभर टक्के राबविल्या आहेत. त्यामुळेच रुई पिंपळा गावाने कायापलट केला आहे. शासनाची अशी एकही योजना या गावाने जाऊ दिली नाही किंवा राबवली नाही असं नाही या योजना राबवण्यात विशेष गावचे प्रथम नागरिक तथा कर्तृत्ववान उच्चशिक्षित आदर्श सरपंच अँड. मयूरभैया आंधळे व त्यांची संपूर्ण टीम सक्षम सहभाग घेत ग्रामस्थांच्या चरणी अर्पण केल्या आहेत. त्यामुळेच विकासात्मक दर्जेदार कामे व योजना सशक्तिकरणाच्या पद्धतीने काम केल्यामुळे हे शक्य झाले आहे असे दिसून येते.

**मयूरभैया आंधळे यांनी दाखवले**

गावचा सरपंच काय करू शकतो, कोणते विकासात्मक कामे आणू शकतो, त्याची अंमलबजावणी कसा करू शकतो, शासनाच्या विविध योजनेमध्ये ग्रामस्थांचा सहभाग कसा नोंदवला जातो आणि गावचा कायापलट करून त्यामध्ये ग्रामस्थांचा कसा सहभाग आहे. ते बोलून नाही तर करून दाखवणारे वडवणी तालुक्यातील एकमेव पुनर्वशीत गावचे उच्चभूषित युवा आदर्श सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांनी करून दाखवले आहे. त्यामुळेच ही दूरदृष्टी कायम ठेवल्याने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानात वडवणी तालुक्यातून नंबर एक येत जिल्ह्याच्या अभियानात सहभाग नोंदवला असल्याने यावरून सरपंच मयूरभैया आंधळे यांनी बोलू नाही तर करून दाखवले आहे.

# मलिकपुरा परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची बाजीराव धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून पाहणी!

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील मलिकपुरा भागामध्ये जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत नागरी दलितेत्तर योजनेमधून करण्यात आलेल्या रस्ता व नाली बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी व न.प.पदाधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली. या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि दैनंदिन जीवनमानात सुधारणा होणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



मलिकपुरा भागातील जामा मज्जीद ते अफसर शेख, निजाम शेख व मेहराज सर यांच्या घरापर्यंत सुमारे ५० लाख रुपये खर्चून नाली व रस्ता बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच हबीबपुरा मज्जीद परिसरातील रस्त्याचे कामही २६ लाख रुपये खर्चून नुकतेच पूर्ण झाले आहे. यावेळी मलिकपुरा भागातील रस्ते व नालेसफाई कामांची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधण्यात आला. नागरिकांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा जाणून घेत येणाऱ्या २०२६-२७ च्या डीपीडीसी अंतर्गत या प्रभागात आणखी विकासकामे प्रस्तावित करण्याबाबतही प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. राज्याचे माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषद शहरात सर्वांगिण, समतोल व लोकाभिमुख विकास घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर परिषद गटनेते वैजनाथ सोळंके, भाजप नेते निळकंठ चाटे, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, स्वच्छता सभापती श्रीकृष्ण कराड, नगरसेवक हाजी बाबा, रमेश पवार, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### उमेश दळवी हत्या प्रकरणातील

अविनाश जोगदंड, सुभाष तांगडे, दशरथ सोनवणे, के. के.कांबळे, मनोज वाघमारे, धम्मा पारवेकर, बाबा देशमाने, बाळासाहेब गव्हाणे, सुनील शिंदे, रतन वाघमारे, दयानंद उजगरे, अक्षय कोकाटे यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते शिवाजीनगर पोलीस स्टेशनला उपस्थित होते.

**निर्घृणपणे केली हत्या**

सहारा हॉटेल समोर शेख इरफान शेख समद उर्फ लाला शेख यांचे अवैध दारू विक्रीचे दुकान असून त्या ठिकाणी उमेश दळवी हा कामगार म्हणून काम करीत होता. रविवार दि. २४ मे २०२६ रोजी त्याला नग्न करून बेदमपणे मारहाण करीत त्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली.

**रिपाइंच्या वतीने जाहीर निषेध**

या हत्या प्रकरणाचा रिपाइंच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून या हत्या प्रकरणात शेख इरफान शेख समद उर्फ लाला शेख यास आरोपी करण्यात आले असून या हत्या प्रकरणातील शून्या शेख व पिल्लू शेख यांना सहआरोपी करण्यात यावे. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. अशी मागणी रिपाइंच्या वतीने अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्याकडे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली.

### नीट पेपरफुटी प्रकरणी

मोरे पाटील, किष्किंधा पांचाळ,सिताबाई भोसले,माजी सैनिक अशोक येडे,सय्यद सादेक, रामधन जमाले, शेख मुबीन, बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी. जी. तांदळे, गणेश आजबे,नितिन जायभाये,राजु गायके,भिमराव कुंटे, कैलासचंद पालिवाल, रफीक पठाण, सुदाम तांदळे, शेख अमर, नितिन सोनावणे, कालिदास वनवे,आदी उपस्थित होते.डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणारे लाखो विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेत असताना कथित पेपरफुटी, निकालातील संशयास्पद बाबी आणि गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाला आहे. शिक्षण व्यवस्थेचे वाढते बाजारीकरण आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.एनटीए संस्थेने विश्वासार्हता गमावली असून ती तात्काळ बरखास्त करावी, दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पारदर्शक व सुरक्षित परीक्षा प्रणाली लागू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

### अवैध वाळू वाहतूक करणारा

माजलगाव तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीचे प्रकार उघड उघड सुरू आहेत. महसूल किंवा पोलीस प्रशासनाकडून अधूनमधून होणाऱ्या एखाद-दुसऱ्या कारवाईने वाळू माफियांना खरोखरच आळा बसणार का? असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करू लागले आहेत. रात्रीच्या अंधारात नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करून दिवसाढवळ्या ट्रॅक्टर, डंपर आणि हायवाच्या माध्यमातून ओव्हरलोड वाहतूक बेधडक सुरू आहे. पोलीस किंवा महसूल विभागाने एखादे वाहन पकडले, गुन्हा दाखल केला की काही दिवस कारवाया चर्चेत राहतात; मात्र त्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होत असल्याचे वास्तव आहे. वाळू माफियांचा व्यवसाय लाखो रुपयांचा असून त्यामागे मोठे आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चा कायम असते. त्यामुळे किरकोळ गुन्हे किंवा वाहन जप्ती यामुळे त्यांच्यावर फारसा परिणाम होत नसल्याचे नागरिकांचे मत आहे. उलट कारवाईची माहिती आधीच मिळत असल्याने अनेकजण प्रशासनालाच चकवा देत असल्याचीही चर्चा आहे.

### पाटोदा शहरात

दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे लहान मुले आणि वृद्धांचे आरोग्य धोक्यात आले आहे.पाण्याचे संकट आणि पुढाऱ्यांची उदासीनताशहरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.नागरिकांच्या या मूलभूत समस्यांकडे लक्ष देण्यास एकाही राजकीय पुढाऱ्याला वेळ नाही.निवडणूक संपताच लोकप्रतिनिधींनी जनतेला वाऱ्यावर सोडल्याची तीव्र भावना नागरिक व्यक्त करत आहेत.प्रशासनाने आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने माऊली नगरसह संपूर्ण शहरातील नाल्यांची स्वच्छता करावी, कचरा कुंड्या उपलब्ध करून द्याव्यात आणि पाणीटंचाईवर मात करावी, अशी मागणी पाटोदावासीय करत आहेत. अन्यथा 'प्रशासनाला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही.

### बीड पोलीस दलात मोठे

फेरबदल करण्यात आले आहेत. बीड, माजलगाव, गेवराई आणि अंबाजोगाई विभागातील पिंक पथकांचे नियंत्रण नवीन अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले आहे. तसेच स्थानिक गुन्हे शाखा , ट्रॅफिक ब्रांच आणि डीएसबी मध्येही नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

**प्रशासकीय शिस्तीचा संदेश:**

एसपी नवनीत कावत यांच्या या 'नो कॉप्रमाईज' भूमिकेमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शिफारस आणली तरी काम होणार नाही, फक्त कामगिरीच बोलेल, असा कडक संदेश या बदल्यांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात गेला आहे. आगामी काळातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी हे फेरबदल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.

### वादळी वाऱ्याचा तडाखा

झाले आहे. सध्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचे काम सुरू असताना सिंचनासाठी महत्त्वाची असलेली सोलार यंत्रणा बंद पडल्याने पुढील शेती नियोजनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत नुकसानाची पाहणी केली. अनेकांनी या नैसर्गिक आपत्तीमुळे प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांतून मोठ्या आशेने सोलार पंप उभारले; मात्र अशा आपत्तीत त्यांचे संरक्षण व विमा यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज आता पुन्हा अधोरेखित झाली आहे. दरम्यान, आष्टी तालुक्यात अनेक भागांत वादळी वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडित होणे तसेच शेतीपिकांचे नुकसान झाल्याच्या घटना समोर येत आहेत. हवामान खात्याने पुढील काही दिवसही वातावरण ढगाळ राहण्याचा अंदाज व्यक्त केला असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# पीएसीएल कंपनीतील अडकलेल्या गुंतवणूकदारांना न्याय द्या -ढाकणे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील हजारो गोरगरीब, कष्टकरी, ऊसतोड मजूर, शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांचे पीएसीएल लिमिटेड कंपनीमध्ये अडकलेले कोट्यवधी रुपये तातडीने परत मिळावेत, यासाठी केंद्र शासनाने विशेष कार्यवाही करावी, अशी मागणी महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन मा. द्रोपदीजी मुर्मू राष्ट्रपती व मा. नरेंद्रजी मोदी पंतप्रधान भारत सरकार यांना मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत सादर करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.



निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील अनेक गरीब, कष्टकरी, ऊसतोड मजूर व शेतमजूर कुटुंबांनी आपल्या आयुष्यभराच्या कष्टातून बचत केलेली रक्कम नोएडा स्थित पीएसीएल लिमिटेड कंपनीमध्ये गुंतवली होती. मात्र मागील सुमारे पंधरा वर्षांपासून या गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये कंपनीमध्ये अडकून पडले असून अद्यापही अनेकांना त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळालेले नाहीत.

या प्रकरणामुळे जिल्ह्यातील अनेक कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. मुलामुलींच्या शिक्षणाचा खर्च भागविणे कठीण झाले असून आरोग्य उपचार, विवाह, घरबांधणी तसेच शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गरीब व कष्टकरी गुंतवणूकदारांना आपल्या हक्काच्या पैशासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. श्री बाजीराव ढाकणे यांनी केंद्र शासनाने या प्रकरणात विशेष लक्ष घालून संबंधित मंत्रालय, सेबी तसेच इतर सक्षम यंत्रणांमार्फत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. तसेच लोकसभेत हा विषय उपस्थित करून बीड जिल्ह्यातील सर्व पात्र गुंतवणूकदारांना त्यांची रक्कम लवकरात लवकर परत मिळवून देण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. गरीब, कष्टकरी व ऊसतोड मजुरांच्या न्यायासाठी शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

# कासेवाडी येथे २२ व्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची आज सांगता

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथे गेल्या २२ वर्षांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची आज मोठ्या उत्साहात सांगता होत आहे. दिनांक १९ मे ते २६ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहा निमित्ताने गेल्या आठ दिवसांपासून कासेवाडी व परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू होती. या सप्ताहाची सांगता आज दिनांक २६ मे रोजी गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होत असून, सकाळी ९ ते ११ या वेळेत हा सोहळा संपन्न होईल. कीर्तनानंतर लगेचच भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, कासेवाडी, आंबेवाडी, ब्रह्मगाव यांच्यासह पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा



**ह. भ. प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांचे होणार काल्याचे किर्तन**

लाभ घ्यावा, असे आवाहन कासेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

या आठ दिवसांच्या सप्ताहाच्या कालखंडात दररोज पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ आणि प्रवचन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहामध्ये रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. ईश्वरी ताई नागरगोजे, ह.भ.प. अजिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. दादा हरी महाराज ठाकरे, ह.भ.प. किशोर महाराज खाडे, ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री, ह.भ.प. काशिनाथ महाराज आणि ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन संपन्न झाले. तर ह.भ.प. कल्याण वाल्लेकर, ह.भ.प. गोविंद पवार, ह.भ.प. श्रद्धाताई गिरी, ह.भ.प. परमेश्वर महाराज शास्त्री, ह.भ.प. तुकाराम महाराज भोसले, ह.भ.प. अशोक डोके सर आणि ह.भ.प. मच्छिंद्र महाराज राऊत यांचे अभ्यासपूर्ण प्रवचन संपन्न झाले. आज महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने या महोत्सवाची सांगता होत आहे.

# बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील -सिद्धेश्वर कोगे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य कृषी महाविद्यालयात 'बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी आणि कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे म्हणाले विद्यार्थांनो बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध पदे, स्पर्धा परीक्षांची रचना आणि तयारीची रणनीती यावर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी २६० विद्यार्थी उपस्थित होते.

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक आलेख उंचावत आहे. याचाच भाग म्हणून, स्पर्धा परीक्षांची अचूक रणनीती हा विद्यार्थांसाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे (एम.एस्सी. ॲग्री इकॉनॉमिक्स) आणि




मॅनेजर संजीत कदम उपस्थित होते. कोगे यांनी विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी सर्वप्रथम मनातील अभ्यासाची, विशेषतः गणित व इंग्रजी विषयांची भीती काढून टाकणे आवश्यक आहे. ही भीती नष्ट झाल्यास यश मिळवणे कसे सोपे होते, हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. त्यांनी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधत गणिताचे प्रश्न सोडवून घेतले आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवला. विद्यार्थ्यांनी बँकिंगसह कृषी क्षेत्रातील इतर स्पर्धा परीक्षांनाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने स्पर्धात्मक वातावरणात घडवले जाते, याचा आढावा घेतला. भविष्यातही येथील विद्यार्थी विविध उच्च पदांवर चमकतील असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिराला सहाव्या व आठव्या सत्रातील तब्बल २६० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बँकिंग आणि कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या संधींची स्पष्ट दिशा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा एडके यांनी केले, तर चोख नियोजन डॉ. राम मोरे यांनी सांभाळले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**संस्थेचे योगदान कौतुकास्पद!**

आदित्य कृषी महाविद्यालयाचा भव्य कॅम्पस आणि विद्यार्थ्यांमधील कलागुण कौतुकास्पद आहेत. माजी विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रांत झालेली निवड, हे आदित्य शिक्षण संस्थेच्या प्रामाणिक प्रयत्नांचे आणि मोठ्या योगदानाचे प्रतीक आहे.

-सिद्धेश्वर कोंगे, संचालक, अल्फा कोचिंग, छत्रपती संभाजीनगर.

cmyk



राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि. २५ मे २०२६





# डिझेलटंचाईमुळे हजारो टन हळद मार्केट यार्डात अडकली; व्यापारी, शेतकऱ्यासमोर संकट

**हिंगोली । प्रतिनिधी**

**मराठवाड्यासह विदर्भातील हळद खरेदी-विक्रीचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीला डिझेल टंचाईची मोठी झळ बसली आहे. बाजार समितीत हळदीची विक्रमी आवक होत असतानाच, डिझेलअभावी वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. परिणामी, व्यापाऱ्यांनी खरेदी केलेली हजारों टन हळद मार्केट यार्डातच पडून असून, खरेदीदार व्यापारी आणि बाजार समिती प्रशासनासमोर संकट उभे राहिले आहे.**



हिंगोली येथील संत नामदेव हळद मार्केट यार्डात दररोज पाच ते सात हजार क्विंटल हळदीची आवक होत आहे. लिलाव सलग दोन दिवस बंद राहिला तर ही आवक दहा ते बारा हजार क्विंटलपर्यंत पोहोचते. त्यामुळे बाजार समिती परिसरात हळद घेऊन आलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसत आहेत. एकीकडे आवक वाढत असताना दुसरीकडे खरेदी केलेली हळद बाहेर पाठविण्यासाठी आवश्यक ट्रकच उपलब्ध होत नसल्याने साठा वाढत चालला आहे. वाढत्या साठ्यामुळे बाजार समितीपुढेही जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विक्रीसाठी येणारी नवी हळद उतरवण्यासाठी जागा अपुरी पडू लागली आहे. डिझेलपुरवठा सुरळीत न झाल्यास येत्या काही दिवसांत हिंगोलीच्या हळद बाजारातील परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला माल परराज्यात पाठवण्यासाठी मालवाहू ट्रक उपलब्ध होत नसल्याने खरेदी केलेली हळद गोदाम, मार्केट यार्डातील टिनशेडमध्ये पडून आहे. नवीन येणाऱ्या हळदीला उतरवण्यासाठी मार्केट यार्डात पुरेशी जागाच शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे आवक सांभाळायची कशी, असा पेच बाजार समितीपुढे निर्माण झाला आहे. हिंगोली मार्केट यार्डातून बिहार, दिल्ली, राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडू आणि कोलकाता यांसारख्या देशातील मोठ्या राज्यांमध्ये आणि शहरांमध्ये हळद पाठवली जाते. या लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी मोठ्या मालवाहू ट्रक्सची आवश्यकता असते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून डिझेलचा तुटवडा जाणवत असल्याने ट्रकमालकांनी वाहने उभी केली आहेत. डिझेलच मिळत नसल्याने परराज्यात जाणारी वाहतूक ठप्प झाली असून पुरवठा साखळीला ब्रेक लागला आहे.

## तंबाखू लागवड आणि त्याचे व्यवस्थापन



**तंबाखू हे एक असे पीक आहे जे कमी वेळात तयार होते आणि शेतकरीही त्यातून चांगला नफा कमावतात. त्याची लागवड कमी खर्चात होते आणि बचतही जास्त होते. तंबाखूचा वापर सिगारेट, बिडी, सिगारेट आणि पान मसाले बनवण्यासाठी केला जातो.**

**माती :** तंबाखूची लागवड करण्यासाठी भुसभुशीत आणि चिकणमाती माती आवश्यक आहे. त्याच्या शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. पाणी साचल्याने झाडे कुजण्यास सुरुवात होते. तंबाखू लागवडीसाठी, जमिनीचे मूल्य ७ ते ९ च्या श्रेणीत असावे.

**तापमान :** तंबाखूच्या बियांच्या उगवणासाठी थंड हवामान आवश्यक असते. हे १५ ते २० अंश तापमानात चांगले वाढते. जेव्हा त्याची पाने पिकण्यास सुरवात करतात तेव्हा त्यांना अधिक तापमान आणि सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते.

**रोपे :** शेतात रोपे लावण्यापूर्वी त्याची चांगली नांगरणी करून नंतर काही दिवस तशीच ठेवावी. तुम्ही नांगरणी केल्यानंतरच शेतात खत टाकता. रोपांची लागवड डिसेंबर महिन्यात सुरू होते आणि त्याचे पीक तयार होण्यासाठी तीन ते चार महिने लागतात. ही झाडे सपाट शेतात कड बनवून लावली जातात. झाडांमधील अंतर दोन ते तीन फूट ठेवावे.

**सिंचन :** रोपे लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे. तंबाखू पिकाला १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाणी लागते. झाडे लावल्यानंतर जमिनीत पाण्यामुळे तण गोठण्यास सुरवात होते, अशा वेळी २० ते २५ दिवसांनी मातीची कुंडी करावी आणि ती वेळोवेळी किंवा मध्यांतराने करावी.

**तंबाखू शेतीतून उत्पन्न :** एक एकरात तंबाखूची लागवड केली तर या हंगामात दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते.

## ड्रोन पायलट बनण्यासाठी मोफत प्रशिक्षणाबरोबरच आता अधिकृत लायसन्सही मिळणार

**पुणे । प्रतिनिधी**

**आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शेती, सर्वेक्षण, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन आणि सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेतर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. प्रशिक्षणानंतर अधिकृत परवानाही दिला जात आहे. त्यामुळे युवकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत.**


अमृत ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उद्योजकता विकास कार्यक्रम राबवते. त्याचाच एक भाग म्हणून अमृत ड्रोन मिशन ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ड्रोन ऑपरेटर (पायलट) बनण्यासाठी १० दिवसांचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णपणे मोफत दिला जातो. सामान्यतः अशा प्रशिक्षणासाठी किमान एक ते दीड लाख रुपये खर्च येतो; मात्र अमृत संस्थेकडून पात्र उमेदवारांसाठी राहण्याची, जेवणाची आणि प्रशिक्षणाची संपूर्ण व्यवस्था विनामूल्य केली जाते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ आतापर्यंत शंभरहून अधिक युवकांनी घेतला असून, अनेकांनी ड्रोन सेवा क्षेत्रात व्यवसाय सुरू करून चांगले उत्पन्न मिळवण्यास सुरुवात केली आहे. अमृत संस्थेच्या या दर्जेदार प्रशिक्षणाची दखल इतर राज्यांनीही घेतली असून, गोवा शासनाने आपल्या ३० अधिकाऱ्यांना अमृत संस्थेकडे ड्रोन प्रशिक्षणासाठी पाठविले होते. राज्यातील आठ ठिकाणी हे प्रशिक्षण दिले जात असून, प्रात्यक्षिक ज्ञानावर विशेष भर दिला जातो. ड्रोनची सुरक्षित हाताळणी, देखभाल, उड्डाण तंत्र, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, जमिनीचे मोजमाप, एरियल फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विविध विषयांमध्ये प्रशिक्षण दिले जाते याशिवाय नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) यांच्या सुरक्षित उड्डाण नियमावलीची माहितीही प्रशिक्षणार्थींना दिली जाते. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर लाभार्थ्यांना अधिकृत परवाना दिला जातो. तसेच स्वतःचा ड्रोन खरेदी करून व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांना अमृत संस्थेच्या कर्ज व्याजपरतावा योजनेचाही लाभ मिळू शकतो.

> **आवश्यक पात्रता :**
> योजनेसाठी अर्ज करणारा उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असावे. उमेदवार किमान बारावी उत्तीर्ण असावा. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. याशिवाय वैद्यकीय अधिकाऱ्यांचा फिटनेस दाखलाही आवश्यक आहे.

> **ऑनलाईन अर्जाची सुविधा :**
> पुण्यातील औंध येथे अमृत संस्थेचे मुख्यालय असून राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये संस्थेची कार्यालये कार्यरत आहेत. संस्थेचे संपूर्ण कामकाज ऑनलाइन पद्धतीने केले जाते.



## शेळ्यांना चारा हिरव्या झाडांची पाने, प्रतिकार शक्तीसह आजार होतात बरे



**बहुतेक वेळा तुमच्या बघण्यात आले असेल की, शेळ्या बाहेर चरायला गेल्यावर काही विशिष्ट झाडांचा किंवा वनस्पतीचा पाला खातात. शेळ्या आजारी पडल्या तर ते स्वतःला बरे करण्यासाठी झाडे किंवा वनस्पतींची पाने खातात. परंतु सध्या बहुतेक शेळीपालक त्यांना बाहेर चरायला नेत नाहीत किंवा त्यांना शेळीपालन व्यवसायासाठी पुरेशी जागा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी अशा उपयुक्त झाडाची पाने द्यावीत. शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी झाडाची पाने द्यावीत. मोरिंगा, कडुनिंब, जामुन, बाईल आणि पेरूची पाने दिल्यास शेळ्यांना जास्त फायदा होईल. ही पाने शेळ्यांना अनेक रोगांपासून दूर ठेवतील.**

हिरवा चारा हा दुभत्या जनावरांसाठी जीवनरक्षकापेक्षा कमी नाही. गाई, म्हशींबरोबरच शेळयांसाठीही हिरवे गवत आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. कारण त्यात अनेक औषधी औषधांचे गुणधर्म आढळतात. हे खाल्ल्यानंतर जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढते. परंतु शेळ्यांसाठी गवतापेक्षा झाडांची पाने आणि वनस्पती अधिक फायदेशीर आहेत. पानांमध्ये असे घटक आणि औषधी गुणधर्म आढळतात, जे सेवन केल्याने शेळ्यांचे अनेक रोग आपोआप बरे होतात. कारण झाडांची पाने शेळ्यांसाठी औषध म्हणून काम करतात.


> **पानांमध्ये टॅनिनचे प्रमाण आणि प्रथिने :**
> वास्तविक, मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने, कडुनिंब, जामुन, आणि पेरूच्या पानांमध्ये मुबलक प्रमाणात टॅनिन सामग्री आणि प्रथिने आढळतात, जे शेळ्यांसाठी खूप उपयुक्त आहेत. त्यांची पाने खाल्ल्याने शेळ्यांच्या पोटात जंत होत नाहीत. त्यामुळे शेळ्यांची वाढ झपाट्याने होते. त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. शेळ्यांच्या पोटात जंत आल्यावर अनेक प्रकारचे आजार आपोआप उद्भवतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

> **शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होते :**
> कडुनिंब, पेरू, जामुन, मोरिंगा ही झाडे तुम्हाला सर्वत्र सहजासहजी दिसणार नाहीत. तरीही तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. सीआयआरजी अशा पानांपासून बनवलेले औषध बाजारात विकत आहे. ते खाल्ल्यानंतर फायदा होईल. त्याचबरोबर शेळीच्या करडांना कडुनिंबाची पाने खाऊ घातल्यास त्यांच्या शरीरातील रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. हे खाल्ल्याने शेळीची करडे सहजासहजी आजारी पडत नाहीत. त्याचबरोबर शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते. शेळीपालनातही सर्वाधिक नुकसान शेळ्यांच्या मृत्यूमुळे होते.

## मूग, उडिद, सोयाबीन, तूर, भूईमुग यांच्या बीजप्रक्रियेची घरगुती पद्धत

**चांगले उत्पादन मिळवण्यासाठी फक्त चांगले बियाणे पुरेसे नसते, तर पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणेही तितकेच महत्त्वाचे असते. अनेक रोग हे बियाणे आणि जमिनीतून पसरतात. बीजप्रक्रिया न केल्यास उगवण कमी होते, रोपे मरतात आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. खरिपात सोयाबीन तूर, उडिद, मूग, भूईमूग या पिकांची बीजप्रक्रिया महत्त्वाचे ठरते.**

**बीजप्रक्रिया आणि त्याचे फायदे:**
बीजप्रक्रिया म्हणजे पेरणीपूर्वी बियाण्यावर बुरशीनाशक, जैविक खत प्रक्रिया करणे. बियाण्यांचे संरक्षण होते. रोपांची सुरुवातीची वाढ चांगली होते. बियाणे व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांपासून संरक्षण होते. बियाण्याची उगवण चांगली होते. रोपे निरोगी आणि जोमदार वाढतात. त्यांच्यावरील रोग व कीड नियंत्रणाचा खर्च कमी होतो. उत्पादनात वाढ होते. जैविक खतांमुळे नत्र स्थिरीकरण होऊन पिकांना अन्नद्रव्ये उपलब्ध होतात.



सोयाबीन : मुळकूज आणि खोडकूज रोग टाळण्यासाठी कार्बेन्डाझिम २५ टक्के अधिक मॅन्कोझेब ५० टक्के डब्ल्यूएस हे बुरशीनाशक किंवा कार्बोक्झिन ३७.५ टक्के अधिक थायरम ३७.५ टक्के डब्लू एस ३० ग्रॅम हे संयुक्त बुरशीनाशक प्रति १० किलो बियाण्यास ३० ग्रॅम वापरावे. त्यानंतर रायझोबियम आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू प्रत्येकी २५० ग्रॅम वापरावेत.

तूर : मर, मुळकूज आणि बियाणे कुज रोगासाठी कार्बोक्सिन ३७.५ टक्के अधिक थायरम ३७.५ टक्के डब्ल्यूएस प्रति १० किलो बियाण्याला ४० ग्रॅम वापरावे. किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी १.० टक्के हे जैविक बुरशीनाशक प्रति १० किला बियाण्याला ८० ग्रॅम इतक्या प्रमाणात चोळावे. त्यानंतर रायझोबियम आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू प्रत्येकी २५० ग्रॅम वापरावेत.

मूग आणि उडीद : मूग आणि उडिद पिकावरील मुळकूज व मर रोग नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम २५ टक्के अधिक मॅन्कोझेब ५० टक्के डब्ल्यूएस प्रति १० किलो बियाण्यास ३० ग्रॅम वापरावे किंवा ट्रायकोडर्मा व्हिरिडी ४० ते ५० ग्रॅम वापरण्याची शिफारसही करण्यात आली आहे. त्यानंतर लागवडीपूर्वी रायझोबियम २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास लावावे.

भुईमूग : भूईमूगचे उत्पादन घेण्याचा भाग मुळातच जमिनीत वाढतो त्यामुळे त्याच्या वर रोगांचा प्रादुर्भाव होणे नुकसानकारक ठरते. मर, मुळकूज व खोडकूज या रोगांसाठी थायरम ७५ टक्के डब्ल्यूएस हे ५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम २५ टक्के अधिक मॅन्कोझेब ५० टक्के हे संयुक्त बुरशीनाशक ३५ ग्रॅम किंवा कार्बोक्सीन ३७.५ टक्के अधिक थायरम ३७.५ टक्के डब्लूएस हे संयुक्त बुरशीनाशक ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

याशिवाय टिक्का या रोगासाठी स्यूडोमोनास फ्लोरोसेन्स ०.५ टक्के डब्ल्यू पी हे बुरशीनाशक १०० ग्रॅम आणि मर रोगासाठी ट्रायकोडर्मा व्हिरीडी १.१५ टक्के डब्ल्यू पी या जैविक बुरशीनाशकाची ४० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्याला बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर रायझोबियम आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू प्रत्येकी २५० ग्रॅम वापरावेत.

**बीजप्रक्रिया करताना काळजी :**
बीजप्रक्रिया करताना प्रथम बुरशीनाशक, नंतर कीटकनाशक आणि शेवटी जैविक खते वापरावीत. दोन प्रक्रियांमध्ये अर्ध्या तासाचे अंतर असावे. प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत वाळवून त्याच दिवशी पेरणी करावी. बीजप्रक्रियेसाठी वापरण्यात येणारी औषधे योग्य प्रमाणातच वापरावीत. तसेच बीजप्रक्रिया करताना हातात मोजांचा वापर करावा. भूईमूग सोयाबीन सारख्या पातळ साल असणाऱ्या बियाण्याला बीजप्रक्रिया करताना जिवाणू संवर्धन अथवा बुरशीनाशकाचे घट्ट द्रावण करावे व बियाणाचे टरफल निघणार नाही याची विषेश काळजी घ्यावी. बीजप्रक्रिया करण्यासाठी मातीचे किंवा धातुचे किंवा प्लास्टिकच्या भांड्याचा वापर करावा. या भांड्याचा वापर पुन्हा अन्न शिजवण्यासाठी, तसेच जनावरांना खाद्य देण्यासाठी करु नये. बीजप्रक्रिया करताना पाणी पिणे आणि अमलीपदार्थांचे सेवन टाळावे.




### महत्वाच्या घटना

१८९६ : निकोलस (दुसरा) रशियाचा झार बनला.
१९५० : ब्रिटन देशाने पेट्रोलच्या खरेदीसाठी राशन कार्डच्या सक्तीचा कायदा रद्द केला.
१९८६ : युरोपमधील देशांनी युरोपीय संघाचा झेंडा स्वीकारला.
१९७१ : बांगलादेशातील सिल्हेट येथे पाकिस्तानी सैन्याने ७१ हिंदूंची कत्तल केली.
१९७३ : बहारीन देशाने संविधान स्वीकारले.
१९८९ : मुंबईजवळच्या न्हावा-शेवा बंदराचे उद्घाटन झाले.
१९९१ : लॉडा एर फ्लाइट ००४ हे बोईंग ७६७ प्रकारचे विमान हवेत असताना थ्रस्ट रिव्हर्सर लागल्याने थायलंडमध्ये पडले. २२३ ठार.
१९९९ : भारत-पाकिस्तानमध्ये कारगिल युद्धाची सुरुवात.
१९९९ : श्रीहरिकोटा येथून पी. एस. एल. व्ही. सी. २ या धृवीय उपग्रहवाहकाने भारताचा आय. एस. एस. पी. ४ (ओशनसॅट), कोरियाचा किटसॅट व जर्मनीचा डी. एल. आर. टबसॅट या तीन उपग्रहांना त्यांच्या कक्षेत यशस्वीरीत्या पोहोचवले.
२००७ : भारत आणि जर्मनी देशांतर्गत सुरक्षा संबंधी करार करण्यात आले.
२०१४ : नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७८ : पोप क्लेमेंट सातवा.
१५६६ : महमद तिसरा, ओट्टोमन सम्राट.
१६६७ : फ्रेन्च गणिती अब्राहम डी. मुआव्हर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १७५४)
१७९९ : अलेक्सांद्र पुश्किन, रशियन लेखक.
१८६७ : टेकची मेरी, पंचम जॉर्जची राणी.
१८८५ : नाटककार, कवी व विनोदी लेखक राम गणेश गडकरी यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९१९)
१९०२ : नाटककार व साहित्यिक सदाशिव अनंत शुक्ल ऊर्फ कुमुदबांधव यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १९६८)
१९०६ : बेंजामिन पिअरी पाल, भारतीय कृषी वैज्ञानिक व संशोधक.
१९०७ : जॉन वेन, अमेरिकन अभिनेता.
१९०८ : न्विन न्गॉक थो, दक्षिण व्हियेतनामचा पंतप्रधान.
१९०९ : आदोल्फो लोपेझ मटियोस, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
१९१२ : यानोस कादार, हंगेरीचा पंतप्रधान.
१९३० : भारतीय-ईराणी भाषेतील शब्दलेखक आणि समीक्षक करीम इमामी यांचा जन्म. (मृत्यू: ९ जुलै २००५)
१९३७ : भारतीय अभिनेत्री आणि गायक मनोरमा यांचा जन्म. (मृत्यू: १० ऑक्टोबर २०१५)
१९३८ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता बी. बिक्रम सिंग यांचा जन्म. (मृत्यू: १२ मे २०१३)
१९४५ : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री विलासराव देशमुख यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑगस्ट २०१२)
१९४६ : प्रख्यात भारतीय राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्या तसचं, मजदूर किसान शक्ती संघटनेच्या संस्थापिका अरुणा रॉय यांचा जन्मदिन.
१९४९ : हँक विल्यम्स जुनियर, अमेरिकन संगीतकार.
१९६१ : भारतीय-अमेरिकन दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक तारसेम सिंग यांचा जन्म.
१९६६ : झोला बड, दक्षिण आफ्रिकेची धावपटू.
१९६८ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन अभिनेते, तसचं, दूरदर्शन विनोदी मालिका तारक मेह्ता का उलटा चश्मा या विनोदी मालिकेतील प्रख्यात कलाकार दिलीप जोशी यांचा जन्मदिन.
१९८३ : अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेल रत्न, पद्मश्री, सीएनएन-आयबीएन इंडियन ऑफ दी इयर स्पोर्ट्स तसचं, सन २००८ साली झालेल्या उन्हाळी ऑलिंपिकमधील कुस्ती पुरुष फ्रीस्टाईल लाइटवेट पदक विजेता सुप्रसिद्ध भारतीय फ्री स्टाईल कुस्तीपटू सुशील कुमार सोलंकी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०३ : विख्यात इंग्रजी रोजनिशीकार व कुशल प्रशासक सॅम्युअल पेपिस यांचे निधन. (जन्म: २३ फेब्रुवारी १६३३)
१९०२ : अमेरिकन संशोधक अल्मोन स्ट्राउजर यांचे निधन. (जन्म: ११ फेब्रुवारी १८३९)
१९०८ : अहमदिया पंथाचे संस्थापक मिर्झा गुलाम अहमद यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी १८३५)
१९७२ : सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेत्री राजलक्ष्मी यांचे निधन.
२००० : प्रभाकर शिरुर, चित्रकार.
२००० : अर्थतज्ञ व लेखक, मराठी भाषेतील पहिल्या अर्थविषयक नियतकालिकाचे संपादक श्रीपाद वामन काळे यांचे निधन.
२०१४ : भारतीय राज्य केरळमधील पठाणमथिट्टा जिल्ह्यातील मालंकारा ऑर्थोडॉक्स सिरियन चर्च चे धर्मगुरू कॅथोलिक बेसीलिओस मार थोमा डिडिमॉस पहिले यांचे निधन.
२०१७ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय पोलीस सेवा अधिकारी आणि पंजाब राज्याचे माजी पोलीस महासंचालक कंवर पाल सिंह गिल यांचे निधन.

# पुणे कृषी हॅकेथॉनमध्ये नॅनोविटा ठरली मृदा आरोग्य व व्यवस्थापन विभागातील उपविजेता

## मुख्यमंत्री व कृषी मंत्र्यांच्या हस्ते १५ लाखाचा धनादेश, स्मृतीचिन्ह देवून डॉ.सोनाली चिंतामणी यांचा गौरव



जालना । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आडगाव येथील डॉ.रविंद्र चिंतामणी व डॉ.सोनाली चिंतामणी यांनी सहकारी स्वप्नील शिंदे व सागर लोंढे यांच्या सोबतीने पुणे येथे उभारलेल्या नॅनोविटा इंटरनॅशनल कंपनीने पिकांच्या उत्तम, निरोगी वाढीसाठी व भरघोस उत्पादनासाठी बनवलेली प्रभावी उत्पादने शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली असून नुकत्याच पुणे येथे संपन्न झालेल्या पुणे कृषी हॅकेथॉनमध्ये नॅनोविटा इंटरनॅशनल प्रा. लि.कंपनी मृदा आरोग्य व व्यवस्थापन विभागात उपविजेता ठरली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नॅनोविटाच्या संचालिका डॉ. सोनाली चिंतामणी यांचा १५ लाख रुपये धनादेश व स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

या पारितोषिक वितरण कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहूल महिवाल, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी जितेंद्र हुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी गजानन पाटील, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती अमोल नलावडे आदींसह इतर मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या हॅकेथॉन स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत,यासाठी शासन प्रयत्नशील असेल. त्याचप्रमाणे हवामान बदल, वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतीसमोरील विविध संकटांवर मात करण्यासाठी तंत्रज्ञानाधारित शेती हा प्रभावी पर्याय आहे. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम कृषी क्षेत्रावर होतो. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता,ड्रोन,उपग्रह आणी अचूक शेती पद्धतीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय शेती क्षेत्रातील संकट दूर करता येणार नाही,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच पुढील वर्षापासून पुणे कृषी हॅकेथॉनचे महाराष्ट्र कृषी हॅकेथॉन मध्ये रूपांतर करण्यात येणार असून, सर्वोत्तम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही फडणवीस यांनी केली. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह इतरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हाधिकारी जितेंद्र हुडी यांनी केले. गेल्या वर्षी पुणे येथील स्टार्टअप एक्स्पोमध्ये मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते नॅनोविटाला बेस्ट स्टार्टअप अवार्डने गौरविण्यात आले होते. पुणे कृषी हॅकेथॉनमध्ये उपविजेत्या पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल संचालिका डॉ.सोनाली चिंतामणी, संचालक डॉ.रविंद्र चिंतामणी, स्वप्नील शिंदे व सागर लोंढे तसेच मदतनीस ऋषिकेश गोसावी, प्रियंका विश्वकर्मा यांच्यासह ''नॅनोविटा'' च्या सर्व टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भोकरदनमध्ये वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या पती - पत्नीवर पोलीसांची कारवाई



जालना प्रतिनिधी

भोकरदन शहरातील म्हाडा कॉलनी येथील गजानन मंदीराजवळ असलेल्या एका टिनपत्राचे शेडमध्ये पती व पत्नी हे बाहेर जिल्ह्यातील महिलांना बोलावुन त्यांच्याकडुन वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची खात्रीलायक बातमी प्राप्त झाल्याने, त्या ठिकाणी छापा मारला. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर माहीती ही मा. पोलीस अधीक्षक तेघबिरसिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन जि. यांना देऊन त्यांच्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक पवन राजपुत, पो.ना. प्रशांत उबाळे, पो.अ.शिवाजी जाधव, पो.अ.संदीप भुतेकर, पो.अ.किशोर मोरे, म.पो.अ.सिमा देठे, जयश्री कुहीरे यांनी म्हाडा कॉलनी येथील ज्ञानेश्वर विनायक वाघ यांच्या मालकीच्या जागेमध्ये जाऊन छापा मारला असता तेथे गणपत रामधीन सेठी वय ५४ वर्ष व एक महिला हे बाहेर जिल्ह्यातून महीलाना आणून आर्थीक फायद्यासाठी वेश्याव्यवसाय करत असल्याचे दिसून आले. पिडीत महिलासह रोख रक्कम ३५,६८० रुपयाचा मुद्येमालही मिळुन आला. वेश्या व्यवसाय चालविणारे पती - पत्नी यांच्यावर कलम ३,४,५, अनैतीक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला आहे. सदर पती व पत्नीवर यापुर्वी सुध्दा पोलीस ठाणे हसनाबाद येथे गुन्हा दाखल आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक तेंघबिर सिंह संधु, अपर पोलीस अधिक्षक श्री. विक्रम साळी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक श्री पवन राजपुत, चालक ग्रेड पोउपनि चव्हाण, पो.अ.प्रशात उबाळे, शिवाजी जाधव, किशोर मोरे, संदीप भुतेकर, म.पो.अ सिमा देठे, जयश्री कुहीरे यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब सहाने, पो.अ. इंदल बमनावत करीत आहे.

# कुपोषणमुक्त जालनासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

मिशन न्युट्रीशन जालना अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय, जालना येथे दि. २५ मे ते ७ जून, २०२६ या कालावधीत आयोजित जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन दि. २५ मे रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ''कुपोषणमुक्त जालना'' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.



जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करून बालकांचे आरोग्य सुदृढ करण्याच्या उद्देशाने आरोग्य विभाग व महिला व बाल विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी, गटप्रवर्तक, आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविका यांना पोषण आहार, संतुलित आहार, माता व बालकांच्या आरोग्याची काळजी तसेच कुपोषण प्रतिबंध याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. प्रशिक्षणासाठी आयआयटी मुंबई यांच्या माध्यमातून पोषण आहारासंदर्भातील शैक्षणिक व्हिडिओचा उपयोग करण्यात येत असून व्हील ग्लोबल फाऊंडेशन यांच्या सहकार्याने प्रशिक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे २५० प्रशिक्षणार्थींना विशेष प्रशिक्षण दिले जाणार असून प्रशिक्षणानंतर प्रत्येक प्रशिक्षणार्थीने १:३ या प्रमाणात मातां व बालकांना दत्तक घेऊन त्यांचे समुपदेशन करायचे आहे. यामध्ये पोषण आहाराचे महत्त्व, संतुलित आहार, बालकांच्या वाढीचे निरीक्षण आणि कुपोषण टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली जाणार आहे. तीन महिन्यांच्या कालावधीत सुमारे २ हजार २५० माता व बालकांपर्यंत या मोहिमेचा लाभ पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम जिल्ह्यातील कुपोषण निर्मूलनासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, डॉ. प्राची तापशेटीवार, डॉ. जी. डी. म्हस्के, महिला व बाल विकास विभागाच्या श्रीमती कोरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक संदीप गुसाळे, साक्षी उगले तसेच आरोग्य विभाग व एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डी पंचायत समितीचा कारभार रामभरोसे !

## मनरेगा कृषी घरकुल योजनेच्या अनुदानात कमिशन गँग सक्रिय

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुका पंचायत समितीचा कारभार रामभरोसे चालला असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ओबीसी आरक्षणामुळे प्रलंबित असल्याने व न्यायप्रविष्ठ असल्याने पंचायत समितीवर प्रशासक राज आहे, परंतु पाथर्डी पंचायत समिती येथे पूर्णवेळ गटविकास अधिकारी नसल्याने पंचायत समिती कार्यालयात कमिशन एजंटचा सुळसुळाट सुरू असून, इथला कारभार राम भरोसे असल्याचे दिसते आहे. यासाठी मोठी कमिशन गँग सक्रिय असल्याचे सांगण्यात येत आहे.

ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असणाऱ्या सरकारी योजना यामध्ये मनरेगा घरकुल, विहिरी, कृषी अवजारे, कांदा चाळ तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत ग्रामपंचायत अंतर्गत पंधराव्या वित्त आयोगातील कामे, जि.प नळ योजना, रस्ते बांधकाम इत्यादी बिले थकल्याने ठेकेदारांसहित शेतकऱ्यांकडून प्रति योजना दहा ते पन्नास हजार रुपये पर्यंत कमिशन घेतल्याशिवाय पंचायत समितीतील अधिकारी बिले व अनुदान अदा करत नाहीत. यामुळे अहिल्यानगर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी तातडीने पाथर्डी पंचायत समितीच्या सर्व विभागाची बैठक घेऊन शेतकऱ्यांची व लाभार्थ्यांची अधिकाऱ्यांकडून व कर्मचाऱ्यांकडून होत असलेली पिळवणूक मोडीत काढावी व पाथर्डी पंचायत समितीला पूर्णवेळ गट विकास अधिकारी नेमावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त किसन आव्हाड यांनी केली आहे.


### अनुदान पाहिजे असेल तर कमिशनसम्राट आका यांना भेटा ?

**केंद्र सरकार पुरस्कृत एमआरजीएस योजनेच्या माध्यमातून पाथर्डी तालुक्यात घरकुल व विहिरी लाभार्थ्यांना अनुदान पाहिजे असेल तर पाथर्डी पंचायत समिती मधील कमिशन सम्राट आकाला भेटून अगोदर प्रति मस्टर १० ते २० हजार रुपये दिल्याशिवाय अनुदान दिले जात नसल्याचा धक्कादायक अनुभव एका लाभार्थ्याला आला असून, त्या अधिकाऱ्याचे नाव लवकरच पुराव्यानिशी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याकडे तक्रार केली जाणार असल्याचे लाभार्थी शेतकऱ्यांनी सांगितले आहे.**

# रक्ताचा तुटवडा असताना एकाच वेळी २२८ जणांचे रक्तदान

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता आणि सुट्यांमुळे दोन महिन्यांपासून रक्ताचा तुटवडा असल्याने रुग्णांचे हाल सुरू आहेत. अशा टंचाईच्या परिस्थिती घाटीतील विभागीय रक्तपेढीसाठी एकाच दिवसांत तब्बल २२८ रक्त पिशव्याचे संकलन झाले. वाळूज येथील एका कंपनीत झालेल्या रक्तदान शिबिरात दात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.



बिल्डिंग हेल्थिअर कम्युनिटी या सामाजिक उपक्रमांतर्गत वाळूज येथील मायलान कंपनीच्या वतीने शुक्रवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी घाटीचे उपअधिष्ठाता डॉ. भारत सोनवणे यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून देत सामाजिकदायित्वातून नियमित रक्तदान करण्याचे आवाहन केले. रक्तदान हेच दात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यावेळी घाटीचे उपाधिष्ठाता डॉ. भारत सोनवणे. श्रेष्ठदान असून संकटाच्या काळात रुग्णांसाठी जीवनदान ठरते असेही सांगितले. रक्त संकलन केंद्राच्या प्रमुख डॉ. अंजली बोर्डे, डॉ. अश्विनी तांगडे तसेच डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी रक्तसंकलनाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. या उपक्रमातून २२८ रक्तपिशव्यांचे संकलन झाल्याने घाटी रुग्णालयातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. कंपनीच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना रक्तदान करण्याचे आवाहन केले. त्यानुसार कर्मचाऱ्यांनीही अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

# दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून तरुणाचा निर्घृण खून

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरातील जवाहर कॉलनी परिसरातील शासनमान्य देशी दारू दुकानालगत असलेल्या पाठीमागील खोलीमध्ये २२ वर्षीय तरुणाचा निर्घृण खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. कलीम महमूद शेख असे मृत तरुणाचे नाव आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जवाहर कॉलनीतील जयस्वाल यांच्या शासनमान्य देशी दारूच्या दुकानात मयत कलीम शेख याच्याकडे त्याचा मावसभाऊ शकील शेख अली याने दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, ''माझ्याकडे पैसे नाहीत, मी कुठून देऊ,'' असे कलीमने सांगितल्याने दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपी शकील शेख अली याने शिवीगाळ करत विटाने कलीमच्या डोक्यावर मारहाण केली. या हल्ल्यात कलीम गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने मंठा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अवैध गोवंश कत्तलीचा प्रयत्न पोलिसांनी उधळला

संभाजीनगर । प्रतिनिधी

वाळूज पोलिसांनी वाळूजलगतच्या नारायणपूरात धाडसी कारवाई करीत अवैध गोवंश कत्तलीचा प्रयत्न उधळून लावला. गावाच्या पूर्व बाजूस असलेल्या एका जुन्या वाड्यात छापा टाकून पोलिसांनी ९ गायींची सुटका केली. या प्रकरणी एका संशयितास ताब्यात घेण्यात आले तर दुसरा आरोपी फरार झाला आहे. विशेष म्हणजे नारायणपुरात यापूर्वीही अशा प्रकारची कारवाई करण्यात आली होती.



या विषयी पोलिसांनी सांगितले की, वाळूज भागात गस्त घालणारे पोउपनि. रमेश राठोड यांच्या पथकाला नारायणपुरात गाईची अवैध कत्तल सुरू असल्याची माहीती मिळाली होती. रविवारी सकाळी वाळूज पोलिस ठाणे हद्दीतील नारायणपूरच्या पूर्व बाजूच्या एका जुन्या वाड्यावर छापा टाकला.

यावेळी तेथे गोवंश कत्तलीची तयारी सुरू असल्याचे निदर्शनास आले. घटनास्थळी ९ गायी आढळून आल्या. तसेच धारदार शस्त्रे, मीठ, पाण्याचे ड्रम, दोरखंड व इतर साहित्यही पोलिसांनी जप्त केलेया प्रकरणी वाळूज पोलिसांनी मोसीन बशीर शेख, बशीर अजीज शेख दोघेही रा. पंढरपुर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शर्मा कुटुंबासाठी जिल्हाधिकारी आणि तहसीलदार ठरले देवदूत !

**जालना/ अंबड । शिवाजी मस्के**

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या सूचनावरून तहसीलदारांसह महसूल पथक येणे तातडीने आर्थिक मदत करण्याचा घेतला निर्णय.अंत्योदय रेशन आणि नवीन हातगाडा उपलब्ध करून देण्यासाठी व कायमस्वरूपी प्रश्न सोडण्यासाठी केला प्रयत्न

समाजातील शेवटच्या आणि अत्यंत गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांना मायेचा आणि प्रशासनाचा आधार देणे, हाच खऱ्या अर्थाने लोकसेवेचा मुख्य गाभा आहे, याची प्रचिती आज अंबड शहरात पाहायला मिळाली. शहरातील मोहन टॉकीजच्या बाजूला, जुन्या वेशीजवळ एका भंगारसदृश जागेत अत्यंत दयनीय आणि हलाकीच्या परिस्थितीत जीवन जगत असलेल्या शर्मा कुटुंबाची व्यथा समोर आली होती. या संवेदनशील दखल जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांनी तातडीने घेतली. दिवसभराचा शासकीय दिनक्रम आटोपल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार तहसीलदार विजय चव्हाण यांनी आपल्या पथकासह पाच वाजता या कुटुंबाच्या निवासस्थानी जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि मदतीचा हात पुढे केला.

निसर्गाचा कोप अन्? परिस्थिती अत्यंत दयनीय:

प्रशासकीय पथकाने जेव्हा या कुटुंबाची वस्तूस्थिती पाहिली, तेव्हा तेथील दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते. ज्या जागेला घर म्हणणेही शक्य नव्हते, अशा भंगारातील साहित्यापासून बनवलेल्या तात्पुरत्या आडोशात हे कुटुंब राहत आहे. पावसाळ्याच्या दिवसांत या घरात १ ते २ फूट पाणी साचून राहते, ज्यामुळे संपूर्ण कुटुंबाला अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागतात आणि आजारपणामध्ये दिवस काढावे लागतात. या कुटुंबात दोन बहिणी आणि एका बहिणीचा मुलगा अशा तीन व्यक्ती एकत्र राहतात. निसर्गाने या कुटुंबावर अत्यंत कठोर आघात केला आहे; यातील एका बहिणीला कुष्ठरोगाची बाधा झालेली असून त्यांच्या हाता-पायाला एकही बोट शिल्लक नाही, तर त्यांचा तरुण मुलगा मुका आणि बहिरा आहे. भाजीपाला विकून हे कुटुंब आपला उदरनिर्वाह चालवत होते.

प्रशासनाकडून जागीच विविध योजनांचा लाभ:

महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेचा लाभ या कुटुंबातील दोघांना मिळत होता. मात्र, ज्या बहीण कुष्ठरोगामुळे अत्यंत गंभीर परिस्थितीत आहेत, त्यांना आधार कार्ड नसल्यामुळे या योजनेचा लाभ मिळत नव्हता. तहसीलदार विजय चव्हाण यांनी तात्काळ आधार केंद्र धारकांशी संपर्क साधला.



संबंधित महिलेकडे असलेल्या मतदान कार्डाच्या (व्होटर आयडी) आधारे तातडीने त्यांचे आधार कार्ड काढण्याची प्रक्रिया जागीच सुरू करण्यात आली. हे आधार कार्ड मिळताच त्यांना दिव्यांग योजनेअंतर्गत दरमहा २५०० रुपयांची विशेष योजना मंजूर करण्यात येणार आहे. तसेच, या कुटुंबाची अत्यंत बिकट अवस्था पाहून पुरवठा विभागामार्फत त्यांना तातडीने अंत्योदय रेशन योजनेचा लाभ मंजूर करून अन्नधान्याची व्यवस्था करण्यात आली.

(उपासमार) रोखण्यासाठी रोकड आणि नवीन हातगाड्याची व्यवस्था

मागच्या काही दिवसांपासून या कुटुंबाचा भाजीपाला विकण्याचा हातगाडा (जो ते भाड्याने चालवायचे) तो पूर्णपणे खराब झाला होता. भाडे देण्याचे पैसे नसल्यामुळे आणि भाजीपाल्यासाठी भांडवल शिल्लक न राहिल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. तहसीलदार विजय चव्हाण यांनी स्वतः या कुटुंबाशी संवाद साधून, ''तुम्हाला नेमकी काय मदत हवी आहे?'' अशी विचारणा केली. त्यावर त्या कुटुंबाने भाजीपाल्याच्या व्यवसायासाठी केवळ २,००० रुपयांच्या भांडवलाची मागणी केली. या संवेदनशील मागणीवर तहसीलदारांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या खिशातून ५,००० रुपयांची रोकड त्यांच्या स्वाधीन केली. तसेच चहा-पाण्यासाठी विचारणा करणाऱ्या तिसऱ्या व्यक्तीलाही तातडीने ५०० रुपये उपलब्ध करून दिले.

या कुटुंबाला पुन्हा कधीही कोणाकडे हात पसरण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचा स्वाभिमान टिकावा, यासाठी प्रशासनाने त्यांना भाड्याच्या गाड्याऐवजी स्वतःच्या मालकीचा एक नवा कोरा हातगाडा ( ) खरेदी करून देण्याची संपूर्ण व्यवस्था केली आहे, जेणेकरून ते आपला व्यवसाय सन्मानाने सुरू करू शकतील.

कायमस्वरूपी निवासासाठी महसूल संघटना सरसावल्या:

या कुटुंबाला या नरकयातनेतून कायमचे बाहेर काढण्यासाठी एक सामाजिक बांधिलकी म्हणून तहसीलदार संघटना, नायब तहसीलदार संघटना आणि महसूल संघटनेच्या वतीने नजीकच्या काळात एक पक्के शेड किंवा घर उभारून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. यासोबतच, शासकीय घरकुल योजनेअंतर्गत किंवा जागेचे पट्टे वाटप करून त्यांना हक्काचे मोफत घरकुल मिळवून देता येईल का, याची तांत्रिक चाचणी महसूल विभागामार्फत सुरू आहे. लवकरच या कुटुंबाचा घराचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल, असे आशादायक चित्र निर्माण झाले आहे.

''प्रशासन नव्हे, तर हे आमचे देवदूत. कुटुंबाला आले अश्रू:

महसूल प्रशासनाने दाखवलेल्या या अत्यंत संवेदनशील आणि तत्पर भूमिकेमुळे शर्मा कुटुंबाला आपले अश्रू अनावर झाले. भावूक होत त्यांनी, ''तहसीलदार साहेब हे आमच्यासाठी देव आहेत आणि जिल्हाधिकारी मित्तल मॅडम या देवीसारख्या आमच्या पाठीशी धावून आल्या,'' अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. महसूल विभागाच्या या संवेदनशील आणि व्यापक भूमिकेमुळे अंबड शहरातील सामाजिक स्तरावरून आणि नागरिकांमधून प्रशासनाविषयी अत्यंत सकारात्मक आणि कौतुकास्पद चर्चा सुरू आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.२६ मे २०२६ | ६

# आरोपीला तात्काळ अटक करा अन्यथा आत्मदहन

## मृतदेह घेऊन नातेवाईक थेट पोलिस अधीक्षक ऑफिसमध्ये दाखल

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नगर रोड परिसरात राहणारे उमेश नवनाथ दळवी (वय ३८) यांच्या मृत्यू प्रकरणाने रविवारी मोठा तणाव निर्माण झाला. उमेश दळवी हे नगर रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये दारू विक्रीच्या ठिकाणी काम करत होते. त्यांना मालकाने मारहाण केल्याचा आरोप पत्नीने केला असून, या प्रकरणी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, सोमवारी (दि. २५) शवविच्छेदनानंतर संतप्त नातेवाईक आणि कुटुंबीयांनी मृतदेह थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात आणत जोरदार आक्रमक भूमिका घेतली. आरोपीला तात्काळ



अटक करा, अन्यथा आम्ही आत्मदहन करू, असा इशारा कुटुंबीयांनी दिल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर उपस्थित होते. त्यांच्या समोरच नातेवाईकांनी संताप व्यक्त करत आरोपीच्या तात्काळ अटक करा नाहीतर आम्ही आत्मदहन करू असा इशारा देखील यावेळी कुटुंबीय व नातेवाईकांनी दिला. स्थिती गंभीर होत असल्याचे पाहून बीडचे पोलीस उपाधीक्षक वेंकटरमना यांनी घटनास्थळी येत नातेवाईकांची समजूत काढली. आरोपींना तातडीने अटक करण्याचे आश्वासन दिल्यानंतर वातावरण निवळले. त्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेला.

## उमेश दळवी हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी : पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बांगरनाला गोरे वस्ती येथील रहिवासी उमेश नवनाथ दळवी वय ४० वर्ष यांची दि.२४ मे २०१६ रात्री ३ वाजता सहारा हॉटेल समोर, अवैध दारु विक्री करणाऱ्या शेख इरफान, शेख समद उर्फ लाला शेख रा.बालेपीर यांच्यासह शून्या शेख व पिल्लू शेख यांनी निर्दयपणे मारहाण करून उमेश दळवी यांची निर्घृणपणे हत्या केली आहे.

या हत्या प्रकरणातील आरोपी शेख इरफान शेख समद



उर्फ लाला शेख यांच्यासह इतर आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्याकडे केली.यावेळी राजू जोगदंड, बबन वडमारे, मुकुंद धुताडमल, ◀◀ पान ३ वर

## अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी केला जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गढी रोडवरील सादोळा चौक परिसरातील हुसेनिया कॉलनी येथे दि.२३ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या हायव्यासह वाळु मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दोन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की, दि २३ मे शनिवार रोजी सायंकाळी ०५:४५ वाजण्याच्या सुमारास गढी रोड, सादोळा चौक येथे भारत बेंझ कंपनीचा हायवा क्रमांक चक-२३,-ण८९९२ हा अवैधरित्या वाळूची वाहतूक करताना आढळून आला.आरोपींनी संगनमत करून कोणतीही परवानगी न घेता अंदाजे सहा ब्रास वाळूची चोरटी वाहतूक केल्याचे यादरम्यान निष्पन्न झाले.या कारवाईत



**शहर पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल**

अंदाजे ३६ हजार रुपये किंमतीची सहा ब्रास वाळू तसेच सुमारे ३० लाख रुपये किंमतीचा भारत बेंझ हायवा असा एकूण ३० लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी मुस्तखीम सलाम शेख (वय ४८, रा. पात्रुड ता. माजलगाव जि. बीड) व असलम लाल सय्यद (रा.पात्रुड ता. माजलगाव जि.बीड) यांच्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरनं १६६/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३०३(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजलगाव तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक प्रकरणे सातत्याने समोर येत असून महसूल व पोलीस प्रशासनाच्या कारवाईनंतरही वाळू माफियांचे धाडस का वाढतं ?या मागं आर्थिक लागेबांधे असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

एखाद-दुसऱ्या कारवाईने वाळू माफियांना लगाम कसा लागणार? ◀◀ पान ३ वर

## नीट पेपरफुटी प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने; शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

देशभर गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांच्या नेतृत्वाखाली बीडमधील विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नागरिक व सुजाण बीडकरांच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे एनपीए प्रशासन मुर्दाबाद, भ्रष्ट शिक्षण व्यवस्था मुर्दाबाद, पेपरफुटी करणा-यांची संपत्ती जप्त करा आदी जोरदार घोषणाबाजी




करत निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात एनटीए संस्था बरखास्त करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

आंदोलनकर्त्यांनी पेपरफुटीच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करून त्यांची संपत्ती जप्त करण्यात यावी तसेच पेपरफुटीमुळे नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही केली.जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.यावेळी आंदोलनात डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, मुबीन शेख, बाळासाहेब ◀◀ पान ३ वर

## पेट्रोल-डिझेल दरवाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले; जनतेत तीव्र नाराजी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कडक उन्हाळा, रोजगाराची कमतरता आणि वाढती महागाई यामुळे आधीच सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीने नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले असताना इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून सर्वच वस्तू महाग होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



सामान्य नागरिकांचे म्हणणे आहे की, ''अच्छे दिन''चे आश्वासन देणारे सरकार आता गरीब आणि मध्यमवर्गीय जनतेची आर्थिक पिळवणूक करत आहे. रोजगार नसताना आणि उत्पन्न घटले असताना वाढत्या महागाईमुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेट्रोलचा दर पूर्वी ₹१०९.५५ प्रति लिटर होता, तो आता वाढून ₹११२.५५ प्रति लिटर झाला आहे. तसेच डिझेलचा दर ₹९६.०८ वरून ₹९९.२८ प्रति लिटरपर्यंत पोहोचला आहे. या दरवाढीमुळे वाहनचालक, शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.नागरिकांनी सरकारने पेट्रोल-डिझेलवरील कर कमी करून महागाईवर नियंत्रण आणावे, अशी मागणी केली आहे.

## खाजगी कापूस खरेदी १ जूनपासून बंद राहणार- सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रांमधील सर्व जिनिंग वर



खाजगी कापूस खरेदी दि.०१ जून पासुन बंद राहणार असून तरी सर्व कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपला शिल्लक राहिलेला कापूस दिनांक ०१ जून २०२६ पर्यंत खाजगी जिनिंग वर विक्रीस आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

कापूस हंगाम २०२५-२६ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रामध्ये केंद्र शासनामार्फत (सीसीआय) १५ मार्च २०२६ पर्यंत कापूस खरेदी झाली होती. त्यानंतर खाजगी कापूस केंद्रावर कापूस खरेदी सुरू आहे व तसेच सध्या खाजगी कापूस केंद्रावर हमीभावापेक्षा जास्त भाव मिळत आहे तरी शिल्लक राहिलेल्या कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपला कापूस दि. ०१ जून २०२६ पर्यंत खाजगी जिनिंग वर विक्रीस आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

## पाटोदा शहरात घाणीचे साम्राज्य

### नगरपंचायतीचे दुर्लक्ष, नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात सध्या कचरा व्यवस्थापनाचा पुरता बोजवारा उडाला असून संपूर्ण शहराला घाणीचा विळखा पडला आहे. नगरपंचायतीच्या ढिसाळ कारभारामुळे आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे पाटोदाकरांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे.कचरा कुंड्या गायब, उघड्यावर कचऱ्याचे ढीगशहरातील बहुतांश वॉर्डांमधून कचरा कुंड्या गायब झाल्या आहेत.कचरा टाकण्यासाठी जागा नसल्याने नागरिक उघड्यावरच कचरा टाकत आहेत.उघड्या कचऱ्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचे प्रमाण वाढले आहे.माऊली नगर (वॉर्ड क्र. ६) ची दुरवस्थावॉर्ड क्रमांक ६ मधील माऊली नगर परिसरात कचऱ्यासोबतच नाल्यांची अवस्था बिकट आहे.येथील नाल्यांची दीर्घकाळापासून स्वच्छता न झाल्याने सांडपाणी साचून राहिले आहे. ◀◀ पान ३ वर



## वादळी वाऱ्याचा तडाखा; बीडसांगवीतील शेतकऱ्याचा सोलार पंप अक्षरशः उडाला

### अडीचशे फूट दूर जाऊन पडले पॅनल; लाखोंचे नुकसान, प्रशासनाकडून मदतीची अपेक्षा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यासह परिसरात रविवारी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने मोठा कहर केला असून, बीडसांगवी येथील शेतकरी मंगेश गोरख पवार यांचे शेतीसाठी बसवलेले सोलार पंप पॅनल पूर्णपणे उध्वस्त झाले आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश पवार यांनी आपल्या शेतातील विहिरीतून पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी ऋध्व एपशीसू कंपनीचा



सोलार पंप बसवला होता. शेती सिंचनासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा सोलार प्रकल्प अचानक आलेल्या वादळी वाऱ्याच्या तडाख्यात अक्षरशः जमिनीतून उपटला गेला.

दिनांक २५ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे चारच्या सुमारास परिसरात अचानक वातावरण बदलले. जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने काही मिनिटांतच रौद्ररूप धारण केले. या वाऱ्याची तीव्रता इतकी मोठी होती की शेतातील सोलार पॅनल सुमारे अडीचशे फूट अंतरावर जाऊन कोसळले. सर्वच्या सर्व सोलार प्लेट्स फुटून चक्काचूर झाल्या असून संपूर्ण यंत्रणा निकामी झाली आहे.

या घटनेमुळे शेतकरी मंगेश पवार यांचे लाखो रुपयांचे नुकसान ◀◀ पान ३ वर

## शहरवासियांनी सहकार्य केल्यास धुळ खात पडलेली भाजी मंडई इमारत वापरात आणणार -आ.विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी

वृध्द महिला भाजी विक्रेतीवर झालेल्या अन्यायाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून भाजी विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स समोरील भाजी मंडई इमारतीची पाहणी केली. या इमारतीत भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते आणि व्यापाऱ्यांना एका छताखाली सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व सुविधा उपलब्ध करून देता येतील का या संदर्भाने त्यांनी प्रत्यक्ष भाजी मंडई इमारतीमध्ये जावून सर्व प्रतिनिधींशी तपशिलवार चर्चा केली. जालना रोड ते पुण्यश्लोक



अहिल्यादेवी होळकर पुतळ्यापर्यंतच्या रस्त्याच्या कामाला भेट दिली. जिव्हाळा या बेघर निवारा केंद्रात जाऊन आ. पंडित यांनी तेथील निराधारांशी संवाद साधून भविष्यात बेघरांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्याचा शब्द दिला. यावेळी त्यांच्या समवेत नगराध्यक्षांसह पदाधिकारी उपस्थित होते.

सोमवार, दि.२५ रोजी आ. विजयसिंह पंडित यांच्यासह बीड नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजी मंडई, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स समोरील भाजी मंडई इमारत, जिव्हाळा या बेघर निवारा केंद्रासह जालना रोड ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापर्यंत सुमारे २ कोटी रुपये किंमतीच्या रस्त्याच्या कामाची स्थळ पाहणी केली. नुकत्याच वृध्द महिला भाजी विक्रेतीवर झालेल्या अन्यायानंतर पालिका प्रशासनाने केलेल्या या पाहणीला अनन्य साधारण महत्व आहे.

## बीड पोलीस दलात मोठे फेरबदल; पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची शिफारशींना केराची टोपली!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलात अत्यंत मोठे आणि व्यापक फेरबदल करण्यात आले असून, तब्बल ३२ पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक (डझ) नवनीत कावत यांनी कोणतीही राजकीय किंवा बाह्य शिफारस न स्वीकारता, अत्यंत पारदर्शक पद्धतीने आणि प्रशासकीय निकषांवरून या बदल्या केल्या असल्याची चर्चा आता पोलीस वर्तुळात रंगू लागली आहे. यामुळे जिल्हा पोलीस दलात एकच खळबळजनक वातावरण निर्माण झाले आहे.

कोणाची कुठे झाली बदली? (महत्त्वाच्या बदल्यांवर एक नजर)

या व्यापक फेरबदलामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) आणि पोलीस उपनिरीक्षक (पोउपनि) दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

काही महत्त्वाच्या बदल्या खालीलप्रमाणे आहेत:

पोनि/ बल्लाळ शितलकुमार रामनाथ: बीड शहर येथून आता (केज पोलीस ठाणे प्रभारी) म्हणून नियुक्ती.

सपोनि/ जाधवर संतोष महादेव: अंबाजोगाई शहर (पिंक पथक) येथून केज

सपोनि/ कोतकर सतिष पांडुरंग: गेवराई येथून अमळनेर

सपोनि/ लांडगे अतुलकुमार सिताराम: शिवाजीनगर (पिंक बीड) येथून गेवराई

सपोनि/ नरवाडे विजय आनंद: आष्टी येथून पिंपळनेर

सपोनि/ मुंडे प्रल्हाद परभतराव: माजलगाव शहर येथून शिवाजी नगर बीड



सपोनि/ साळवे मंगेश भागवत: अंभोरा येथून नेकनूर सपोनि/ हिंगे विक्रांत दिलीप: आष्टी येथून पोउपनि/ औटे शेखर बळीराम: टी.ए.सी बीड येथून (स्थानिक गुन्हे शाखा).

पोउपनि/ लहाणे स्वाती नाना: सायबर पोस्टे बीड येथेच १ वर्षाची मुदतवाढ (एींशपीळेप) देण्यात आली आहे.

कोणत्याही 'वजनाला' भीक नाही; एसपींचा पारदर्शक कारभार!

पोलीस दलात बदल्या म्हटल्या की नेहमीच शिफारशी, राजकीय दबाव आणि अंतर्गत 'फिल्डिंग'ची जोरदार चर्चा असते. मात्र, पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अनेक अधिकाऱ्यांनी आपल्या सोयीच्या जागी बदली मिळवण्यासाठी मोठ्या राजकीय नेत्यांच्या शिफारशी आणल्या होत्या. मात्र, एसपी कावत यांनी कोणत्याही दबावाला किंवा शिफारशीला थारा न देता, केवळ कर्तव्यदक्षता, कामाचा अनुभव आणि कायदा व सुव्यवस्था मजबूत करणे या निकषांना प्राधान्य दिले.

'पिंक पथक' आणि गुन्हे शाखेत मोठे फेरबदल

जिल्ह्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'पिंक पथक' मध्येही मोठे ◀◀ पान ३ वर

## खरीप हंगाम तयारी व प्रमुख पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी बोरखेड येथे प्रशिक्षण

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम तयारी व प्रमुख पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, त्याच अनुषंगाने बोरखेड वडवाडी येथे विशेष प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या मोहिमेचा मुख्य उद्देश विविध कृषी मोहिमांद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत तज्ज्ञ बनवणे हा आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री सुभाषजी साळवे, कृषी उपसंचालक श्री दादाराव जाधवर, प्रकल्प उपसंचालक आत्मा श्री सुरज पाटील, उपविभागीय कृषी




अधिकारी बीड श्री उद्धव गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका कृषी अधिकारी बीड श्री अशोक साळी व मंडळ कृषी अधिकारी चौसाळा श्री सतीश मिटकरी यांच्या नियोजनातून हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कृषी तंत्रज्ञान विद्यालय, राजुरी येथील प्राध्यापक श्री ज्ञानेश्वर मिसाळ उपस्थित होते. त्यांनी एल निनो विषयावर शेतकऱ्यांना सोप्या भाषेत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच एल निनो जनजागृतीसाठी शिवार फेरी आयोजित करून प्रत्यक्ष शेतावर जाऊन माहिती देण्यात आली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26